कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

## शाळांना सार्वजनिक सुट्टी

राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांचे बुधवारी (दि.२८) सकाळी बारामती येथे अपघाती निधन झाले. त्यामुळे राज्यात तीन दिवस दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. बुधवारी एक दिवस सर्व शाळांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक, उच्च माध्यमिक विभागाच्या तीन हजारांहून अधिक शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. तसेच सरकारी कार्यालयातील कामकाजही थांबविण्यात आले असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## जिल्ह्यात पुकारला बंद

राष्ट्रवादीचे नेते माजी उपमुख्यमंत्री अजित पवार सकाळी बारामती येथे विमानाने येत होते. दरम्यान, लँडींगच्यावेळी विमान दुर्घटनेत अजित पवार यांचा मृत्यू झाला. पवार यांच्या निधनाने राज्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. जिल्ह्यातील अलिबागसह केरळ, कर्जत, रोहा अशा अनेक ठिकाणी बंद पाळण्यात आला आहे. बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या आहेत. गजबजणाऱ्या बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसून आला. त्याचप्रमाणे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांकडून आज सर्व प्रचारसभा रद्द करण्यात आल्याचे दिसून आले.








## दादांची कारकीर्द

**जन्म २२ जुलै १९५९**
**निधन २८ जानेवारी २०२६**

- जन्म २२ जुलै १९५९ : देवळाली, ता. राहुरी, जि. अहमदनगर
- शिक्षण : बारावी- बीकॉम
- वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी असल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण.
- १९८२ मध्ये पुण्यातील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले.
- १९९१ मध्ये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष होण्याचा मान.
- १९९१ मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले.
- १९९१ मध्ये खासदारकीचा राजीनामा, बारामती विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीतून पहिल्यांदा आमदार झाले.
- १९९१ पासून २०२४ पर्यंत एकूण आठ वेळा बारामतीतून आमदार म्हणून निवडून आले.
- ३० वर्षांहून जास्त काळ बारामतीचे प्रतिनिधीत्व, प्रत्येक टर्ममध्ये मोठ्या मताधिक्क्याने विजयी.
- १९९१-९२ साली काँग्रेस सरकारमध्ये कृषी आणि विद्युत राज्यमंत्री
- १९९२-९५ साली काँग्रेस सरकारमध्ये मृद संवर्धन, विद्युत आणि नियोजन राज्यमंत्री.
- १९९९-२००४ साली काँग्रेस-एनसीपी सरकारमध्ये जलसिंचन-कृष्णा खोरे आणि कोकण सिंचन कॅबिनेट मंत्री.
- २००४-२००९ साली काँग्रेस-एनसीपी सरकारमध्ये जलसंपदा कॅबिनेट मंत्री.
- २००९-१० साली काँग्रेस-एनसीपी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री- कृषी, ग्रामविकास, नियोजन आदी विभागांचा कार्यभार.
- २०१०-२०१४ साली काँग्रेस-एनसीपी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री, नियोजन, ऊर्जा विभागाचा कार्यभार.
- २०१९ उपमुख्यमंत्री, भाजप-एनसीपी सरकार
- २०२२-२३ साली भाजप-शिवसेना शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री - अर्थ, नियोजन विभागाचा कार्यभार.
- २०२४-२६ साली भाजप-शिवसेना शिंदे-राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आणि अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क विभागाचा कार्यभार.

## अजित, तुझ्या निर्णयक्षमतेला महाराष्ट्र मुकला : शरद पवार

महाराष्ट्राचं हे कधीही भरुन न निघणारं नुकसान आहे, असे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांनी म्हटले. हा अपघाती मृत्यू महाराष्ट्राला प्रचंड असा धक्का आहे. एक कर्तृत्ववान निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र मुकला. जे काही नुकसान झालं ते भरुन निघणारं नाही. पण सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात. कातरलेल्या आवाजात, डोळ्यातील पाणी डोळ्यातच साठवत शरद पवारांनी महाराष्ट्रासाठी ही प्रतिक्रिया दिली. तसेच, हा केवळ अपघात आहे, याच्यात राजकारण नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दादांचा मोकळेपणा न विसरण्यासारखा : जयंत पाटील

अजित पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी कळल्यावर खूपच वाईट वाटले. त्यांच्या निधनाच्या बातमीने सुन्न झालो. अजितदादा हे एक स्पष्टवक्ते होते. दिलेले शब्द पाळणारे नेते म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखतो. महाराष्ट्र स्तरावरील सर्व संस्थांसोबत काम करताना त्यांच्यासोबत जवळीकता आली. विधिमंडळामध्ये अभ्यासपूर्ण आणि वाचन करून उत्तर देणारे ते नेते होते. आमच्या तीन पिढ्यांचे पवार कुटुंबियांसोबत संबंध आहेत. ते आजही कायम आहेत. व्यक्तीगत संबंध कधीही सोडले नाही. दादांसोबत मार्केटिंग फेडरेशन व अन्य संस्थांमध्ये काम करताना निर्णय प्रक्रियेमध्ये मला घेण्यामध्ये त्यांचे एक वाखाणण्याजोगे काम होते. महाराष्ट्रात आज गरज असताना, अजितदादांचे असे अपघाती निधन होणे, ही मोठी दुर्दैवी घटना आहे. गेल्या महिन्यामध्ये एका कामानिमित्त शरद पवार, अजित पवार व मी असे तिघेजण एकत्र बसलो होतो. तीन तास गप्पागोष्टी करीत होतो. ती आठवण सतत येत आहे. अजितदादांचा मोकळेपणा महाराष्ट्र कधीच विसरणार नाही, अशी प्रतिक्रिया शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त करीत शेकाप व पाटील कुटुंबियांतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## कुटुंब प्रमुख गमावला : खासदार सुनील तटकरे

आमचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने आम्ही आमचा कुटुंबप्रमुख गमावला आहे. त्यांचे आकस्मिक निधन हे धक्कादायक आणि मन पिळवटून टाकणारे आहे. त्यांच्या निधनाने एक कुशल प्रशासक, अभ्यासू, रोखठोक आणि सदैव ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करणारे कर्तृत्ववान नेतृत्व हरपले आहे, अशी प्रतिक्रिया पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी दिली. गेली अनेक वर्षे दादांसोबत काम केले असून, ज्या-ज्या वेळी आमची भेट झाली, त्या प्रत्येक वेळी दादा हे शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर ठाम राहूनच काम केले पाहिजे, यावर भर द्यायचे. महाराष्ट्रातील तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सरकारच्या योजना पोहोचल्या पाहिजेत, ही त्यांची कायमची आग्रही भूमिका होती. शेतकऱ्यांप्रती असलेली त्यांची तळमळ आणि संवेदनशीलता मी अगदी जवळून अनुभवली आहे. माझ्या वैयक्तिक तसेच सार्वजनिक जीवनात अजितदादांचे मार्गदर्शन, विश्वास आणि पाठबळ मला सदैव लाभले. कठीण निर्णयांच्या प्रसंगी त्यांची स्पष्ट व ठाम भूमिका, प्रशासनावरची मजबूत पकड आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आपुलकी आम्हा सर्वांसाठी नेहमीच दिशादर्शक ठरली. त्यांच्या नेतृत्वशैलीतून अनेक कार्यकर्ते घडले. आजचा दिवस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत दुःखद आणि काळा दिवस ठरला आहे. अजितदादांचे असे आकस्मिक जाणे ही कधीही न भरून निघणारी हानी आहे, असेही तटकरे म्हणाले.

# राजकारणातील धुरंधर हरपला

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार (६६) यांचे मुंबईहून बुधवारी (दि. २८) बारामतीकडे जाताना विमान अपघातात दुःखद निधन झाले आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रासह देशभरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे. स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर मजबूत पकड, जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण आणि ते सोडवण्याची क्षमता असलेल्या तसेच सामान्य माणूस, शेतकरी, सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेल्या लोकनेत्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. महाराष्ट्राने राजकारणातील धुरंधर व लोकाभिमुख नेतृत्व गमावले आहे, अशा शोकभावना व्यक्त करण्यात येत आहेत. राज्य शासनाच्यावतीने राज्यात पुढील तीन दिवस शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला असून, सर्व शासकीय कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. उद्या गुरुवारी (दि. २९) बारामती येथे शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातील वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

अजित पवार हे व्हीएसआर कंपनीच्या चार्टर्ड विमानाने मुंबईतून बारामतीकडे निघाले होते. त्यांच्या विमानाने बुधवारी सकाळी ८.१० मिनिटांनी उड्डाण घेतले होते. सकाळी पावणे नऊच्या सुमारास पायलटने बारामती विमानतळावर विमान लँड करण्याचा प्रयत्न केला. मात्र, यादरम्यान विमानाने हवेत हेलकावे खाल्ले आणि विमान खाली कोसळले. विमान कोसळताच मोठा स्फोट झाला. या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवार जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. महाराष्ट्र हवाई वाहतूक विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान लँडिंगसाठी बारामती विमानतळाजवळ येत होते. सुरुवातीला पायलटला धावपट्टी स्पष्ट दिसत नव्हती, म्हणून त्याने विमान जास्त उंचीवर नेले. अहवालानुसार, त्यावेळी दृश्यमानता सुमारे दोन हजार मीटर होती.

विमान लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. यादरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि क्रॅश झाले. त्यानंतर लगेचच त्यात आग लागली. लँडिंगदरम्यान पायलटने कोणतेही आपत्कालीन सिग्नल दिले नाहीत, असा दावाही करण्यात येत आहे. त्याने 'मेडे' कॉलदेखील केला नाही, असे सांगण्यात येत आहे. परंतु, तपासाअंती सर्व गोष्टी उघड होणार असल्याचे बोलले जात आहे.

अधिकचे वृत्त पान ३ वर



## असा होता कार्यक्रम

- २८ जानेवारी २०२६ रोजी, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामतीमध्ये अजित पवार यांच्या चार सभा होत्या.
- सकाळी पावणे नऊ वाजता विमानाच्या लँडिंगदरम्यान विमानाचा अपघात झाला. अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाल्याचे साडेनऊच्या दरम्यान डीजीसीएने अधिकृतरित्या सांगितले.

## उपमुख्यमंत्रीपदाचा विक्रम

१९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ असे सलग त्यांनी बारामती मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. त्यांनी मंत्रिमंडळात कृषी आणि ऊर्जा राज्यमंत्री म्हणून काम केले. पाणी पुरवठा, नियोजन राज्यमंत्री, पाटबंधारे, फलोत्पादन, ग्रामीण विकास, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, पाटबंधारे मंत्री, तर राज्याचे अर्थमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द उल्लेखनीय राहिली आहे. अजितदादांनी उपमुख्यमंत्री पदाचा विक्रम केला. सातवेळा उपमुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे.

## ६६ वर्षे, ६ महिने, ६ दिवस... 'सहा'ने केला घात!

अजित पवार यांच्या निधनानंतर वयाचा एक विचित्र योगायोग दिसून आला आहे. अजित पवारांच्या आयुष्याचा शेवटचा आकडा पाहून अनेकांच्या मनात गूढ शांतता आणि अस्वस्थता दाटून आली आहे. तो आकडा आहे, ६... अजित पवारांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी झाला आहे. तर, त्यांचं दुर्दैवी निधन २८ जानेवारी २०२६ ला झालं आहे. यावरून त्यांचा जीवनकाळ ६६ वर्षे, ६ महिने आणि ६ दिवस इतका होता. दरम्यान, अजित पवार यांच्या निधनाशी संबंधित हा दैवी योगायोग म्हणायचा की काळाचा खेळ? या घटनेचा ६ अंकाशी संबंध असून, या ६ अंकानेच घात केला, अशी चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहे.

# ‘पाणी द्या,अन्यथा मतदान नाही’

## किरवलीतील महिलांचा निवडणुकीवर बहिष्कार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील किरवली ग्रामपंचायत मधील पाण्याच्या प्रश्नावर प्रशासनाकडून वारंवार होणाऱ्या होणाऱ्या दुर्लक्षामुळे येथील महिला संतप्त झाल्या आहेत. त्यामुळे त्यांनी आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा पवित्रा घेतला आहे. पाणी टंचाईचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत एकही महिला मतदान केंद्रावर पाऊल ठेवणार नाही, असा आक्रमक निर्धार या महिलांनी केला असून, या संदर्भातील स्वाक्षरी मोहीम सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे.



गेल्या अनेक काळापासून किरवली परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. हंडाभर पाण्यासाठी महिलांना रानोमाळ वणवण करावी लागत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने देऊनही या प्रश्नावर कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. आश्वासनांचा पाऊस पडला, तरी पाण्याचा ठिपका मात्र मिळालेला नाही, अशी भावना ग्रामस्थांमध्ये आहे. गावातील सार्वजनिक ठिकाणी महिलांनी एक मोठा फलक लावून त्यावर आपली निषेध नोंदवला आहे. या फलकावर ‘पाणी टंचाई संबंधित मतदानावर बहिष्कार, महिला मतदान करणार नाहीत’ असा स्पष्ट मजकूर लिहिण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गावातील शेकडो महिलांनी यावर आपली नावे लिहून आणि स्वाक्षऱ्या करून या लढ्यात आपला सहभाग नोंदवला आहे. ज्यांना मतदान करायचे नाही त्यांनी नावे लिहा, असे आवाहन करत या महिलांनी एकजुटीचे दर्शन घडवले.

दरम्यान, निवडणुकीच्या प्रचारासाठी गावात येणाऱ्या उमेदवारांना आता महिलांच्या या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. महिलांनी घेतलेल्या या निर्णयामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी घटण्याची शक्यता निर्माण झाली असून, राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आता या बहिष्काराची दखल प्रशासन घेणार की महिला आपला हा लढा मतदानाच्या दिवसापर्यंत सुरू ठेवणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## हनुमान कोळीवाडा पंचायतीतील गैरव्यवहार उघड

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२-१३ या कालावधीत झालेल्या आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहारावर तब्बल १२ वर्षांच्या तपानंतर प्रशासनाने कारवाईचे आदेश दिले आहेत. मात्र, आदेश देऊनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी पंचायत समिती रोहा येथील सहाय्यक गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी केलेल्या चौकशी अहवालात लेखापरीक्षण अहवाल सन २०१२-१३ मधील अनेक गंभीर अनियमितता स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. त्यानुसार दोषी सरपंच व ग्रामसेवकावर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई करून अपहाराची रक्कम वसूल करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# तरुणांच्या भवितव्याची अंधाराकडे वाटचाल


**। उरण । प्रतिनिधी ।**

राज्यात आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रत्येक निवडणुकीत राजकीय पक्षांचे ढोल, आश्वासनांचे फुगे आणि भाषणांची आतषबाजी सुरू असते. परंतु, या साऱ्या गदारोळात उरणचा स्थानिक तरुण मात्र कायमच दुर्लक्षित रहातानाचे चित्र पहावयास मिळत आहे.

आज उरणमधील तरुण उच्चशिक्षित व पदवीधर आहे. परंतु, त्याच्या हाताला कायमस्वरूपी रोजगार नाही, शिक्षणाच्या कुवतीप्रमाणे नोकरी नाही, पगार नाही. वेळीच याचा विचार झाला नाही तर उरणच्या तरुण पिढीचे भवितव्य अंधारात ढकलले जाणार, हे विदारक वास्तव आहे. एकेकाळी रायगड जिल्ह्यातील भाताचे कोठार म्हणून ओळखला जाणारा उरण तालुका विकासाच्या नावाखाली कवडीमोल भावात जमीन गमावून बसला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल, गॅस टरबाईनसारखे महाप्रकल्प उभे राहिले. सुरुवातीला स्थानिकांना थोडेफार प्राधान्य दिले गेले; मात्र, आज त्यांच्या वारसांना दरवाज्यातही उभे राहू दिले जात नाही.

त्यामुळे राजकीय पक्षांनी हे लक्षात घ्यावे की, उच्चशिक्षित, रोजगारात असलेली तरुण पिढी हीच उद्याच्या राजकारणाची ताकद आहे. जर हीच पिढी बेरोजगार राहिली, दिशाहीन झाली तर उद्या राजकारण्यांच्या प्रचारासाठीही कुणी उरणार नाही हे धान्यात घ्यावे. भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरणमधील तरुण शेतकरी भूमिहीन, बेरोजगार होऊन रस्त्यावर येऊ नये, यासाठी आता फक्त भाषण नव्हे, ठोस निर्णय हवेत. नाहीतर उरणच्या तरुण पिढीचे भवितव्य अंधारमय होत जाईल, अशी प्रतिक्रीया उमटत आहेत.

# नेरळ येथे हरिनाम सोहळ्याला सुरुवात



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ जवळील कोलीवली गाव आणि परिसर यांच्यावतीने अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन केले आहे. श्री संत सेवा वारकरी संप्रदाय मंडळ यांच्या अखंड हरिनाम ज्ञानयज्ञ सोहळ्याला २४ वर्षे पूर्ण झाली असून यावर्षी २५वे वर्षी हा सोहळा साजरा होत आहे.दि.२८ ते ३१ जानेवारी या कालावधीत हा हरिनाम सोहळा साजरा होणार असून बुधवारी या अखंड हरिनाम सोहळ्याला संत ज्ञानेश्वर पारायणाने सुरुवात झाली.

कर्जत तालुक्यातील नेरळ जवळील कोलिवली आणि परिसरातील वारकरी संप्रदायामुळे कोळीमध्ये २४ वर्षे अखंड हरिनाम ज्ञानयज्ञ सोहळा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सुरू केले. श्री संत सेवा वारकरी संप्रदाय मंडळ परिसर यांच्या माध्यमातून अखंड हरिनाम सोहळा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कोलीवली येथे हा सोहळा सुरू आहे. गेली २४ वर्षे कोळीवली गावी या साडेतीन दिवसांचे सोहळ्यात प्रवचन, हरिकीर्तन, भजन हरिपाठ ज्ञानेश्वरी पारायण, काकडा, भजन, अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अखंड हरिनाम ज्ञानयज्ञ सोहळा आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मधून वारकरी संप्रदाय घडत आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात २८ जानेवारी रोजी पहाटेच्या काकड्याने झाली. त्यानंतर संत ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले. या सोहळ्यात हरीकीर्तन महादेव शिंदे, जयश्रीत घोरट आणि ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचे हरिकीर्तन पार पडले. तर, काल्याचे कीर्तन कैलास भोईर यांनी केले.

## प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

महिला उद्योग मंडळ प्राथमिक शाळेत दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजवंदन, राष्ट्रगीत, समूहगीत, कवायती, संगीत कवायत आणि देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण भारून गेले होते. कार्यक्रमानिमित संस्थेच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, उपाध्यक्ष शारदा दराडे, सचिव सुनंदा कुलकर्णी, खजिनदार



सुनीता कराड, सदस्य हर्षदा पालव, शोभा देऊळगावकर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका ललिता गुडसे यांनी केले. तर, आभार वर्षा पाटील यांनी मानले.

## ओमेय परब, आसिफ शेख यांचा सन्मान

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त (दि.२५) रविवारी जिल्हास्तरावर आयोजित कार्यक्रमात निवडणुकीसंबंधी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा नुकताचा सन्मान करण्यात आला. यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये उरण तहसील कार्यालयातील



महसूल सहाय्यक आसिफ जमालभाई शेख व तांत्रिक सहाय्यक ओमेय हरेश्वर परब यांना सन्मानित करण्यात आले. तसेच, त्यांना पुढील वाटचालीसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ‘पैशाने तुटली नाती’ नाट्य प्रयोगाला प्रतिसाद

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

‘पैशाने तुटली नाती’ या नाट्य प्रयोगाला उरण परिसरातील रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. पिरकोन येथील बाळ विघ्नहर्ता माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने गणेश मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘पैशाने तुटली नाती’ या वास्तववादी कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाट्यकलाकृतीचा देखणा प्रयोग सोमवारी (दि.२६) पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणात सादर करण्यात आला. या नाट्य प्रयोगाचे उद्घाटन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष कृष्णा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जीवन गावंड, मुकुंद गावंड, कमलाकर गावंड, रमाकांत गावंड, गोरख ठाकूर, विनोद पाटील, बाळकृष्ण पाटील, काशिनाथ पाटील, रमाकांत घरत, अशोक म्हात्रे, रमेश कोळी, हसूराम पाटील, धनेश्वर म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे, कैलासराजे घरत, प्रज्योत पाटील या मान्यवरांसह गणेश मंडळाचे अध्यक्ष बारकानाथ जोशी, हरिभाऊ म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, मनीराम गावंड, राजेंद्र ठाकूर आदी जण उपस्थित होते.

# उरण नगरपरिषदेचा ‘भ्रष्टाचार राज’ ?

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यकाळात शहराचा विकास नव्हे, तर भ्रष्टाचाराचाच सुळसुळाट झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. विकासकामांच्या नावाखाली प्रत्यक्षात काहीच न करता केवळ कागदावर कामे दाखवून लाखो नव्हे तर कोट्यवधी रुपयांची बिले काढण्यात आल्याचे आरोप उरणच्या नाक्यानाक्यावर चर्चेचा विषय ठरले आहेत. प्रशासकीय राजवटीत उरण नगरपालिकेने निविदा प्रक्रिया डावलून परस्पर एकाच ठेकेदाराला ठेके बहाल केल्याचे गंभीर आरोप होत आहेत. दानीच्या दानाबरोबरच अधिकारी वर्गाची झोळी भरली गेल्याची चर्चा उघडपणे सुरू असून, या व्यवहारातून जनतेच्या पैशांची सरळसरळ लूट झाल्याचा आरोप सामाजिक संघटना व नागरिकांकडून केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, प्रशासकीय काळात शहरात तीव्र पाणी टंचाई भासत असतानाही काही बिल्डरांनी इमारतींचे टॉवर उभे करण्यासाठी उरणकरांच्या पिण्याच्या पाण्याचा खुलेआम वापर केल्याचे प्रकार समोर आले आहेत. एकीकडे सामान्य नागरिकांना पाणी कपातीला सामोरे जावे लागत असताना, दुसरीकडे नगरपालिकेच्या आशीर्वादाने बांधकामांसाठी पिण्याचे पाणी वळवले जात असल्याचा संतप्त आरोप होत आहे. याच काळात प्रशासकीय अधिकारी मुख्याधिकारी समीर जाधव यांना पदोन्नती मिळूनही ती न स्वीकारता ते आजही उरण नगरपालिकेत मुख्याधिकारी पदावर कार्यरत आहेत. तसेच, गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपट्टी न भरल्याने थकबाकी तब्बल ४० कोटींच्यावर पोहोचली आहे. निवडणुकीनंतर काहींच्या सागण्यावरून एमआयडीसीकडून पाण्याचा दाब कमी दिला जात असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.

# न्याय्य हक्कांसाठी ‘देवदूत’ रस्त्यावर

**। उरण । प्रतिनिधी ।**

पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करून अनेकांचे प्राण वाचविणाऱ्या ‘देवदूत’ कामगारांच्या न्याय्य मागण्यांकडे आयर्न पंप कंपनी प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे. त्याच्या निषेधार्थ कुसगाव येथे भारतीय मजदूर संघाच्या माध्यमातून तीव्र आंदोलन करण्यात आले.




या कामगारांकडून अत्यंत धोकादायक व जबाबदारीचे काम करून घेतले जात असतानाही त्यांना योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा, विमा संरक्षण, सुरक्षितता साधने, कामाचे निश्चित तास व कायदेशीर हक्क मिळत नाहीत. या अन्यायकारक परिस्थितीविरोधात भारतीय मजदूर संघाने रस्त्यावर उतरून प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनाचे नेतृत्व संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, भारतीय मजदूर संघाचे उपाध्यक्ष सचिन मेंगाळे, महाराष्ट्र अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सचिव सागर पवार आदींनी केले. यावेळी उपस्थित नेत्यांनी स्पष्ट इशारा दिला की, देवदूत कामगारांच्या प्रश्नांवर तात्काळ ठोस निर्णय न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल व ही लढाई राज्य स्तरावर नेली जाईल. तसेच, भारतीय मजदूर संघाने कंपनी व्यवस्थापन व संबंधित यंत्रणांना, देवदूत कामगारांना वेतनवाढ, सर्व कायदेशीर लाभ व सामाजिक सुरक्षा तात्काळ लागू करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

# प्रशासनाच्या मानसिकतेवर पर्यायी मार्गाची धुरा

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

जवळपास पाच दशकांपासून माथेरानमधील स्थानिकांची पर्यायी मार्गाची मागणी आहे. परंतु, आजतागायत प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केल्याने माथेरानचा आणि भुमीपुत्रांचा सर्वांगीण विकास झालेला नाही. सद्यस्थितीत नेरळ मार्गे माथेरान हा एकमेव घाटरस्ता उपलब्ध असल्याने अनेकदा सुट्ट्यांच्या हंगामात पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्याचा नेहमीच विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे.



१८५० मध्ये माथेरानचा शोध ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांनी लावला, त्यावेळी ते कर्जत-चौक बोरगाव मार्गे रामबाग पॉईंट येथूनच आले होते. त्यावेळेस त्यांनी या ठिकाणी काळ्या दगडी पायवाटेचा रस्ता बनविला होता. तो आजही शाबूत आहे. त्यामुळे हा मार्ग एक पर्यायी व्यवस्था म्हणून विकसित केल्यास अत्यंत कमी खर्चात आणि जवळचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो. मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत बोरगाव ते माथेरान रामबाग पॉईंट पर्यंतचा मार्ग शासनाने पाठपुरावा करून पूर्णत्वास न्यावा, या आशयाचे निवेदन येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन विश्वनाथ सावंत यांनी माथेरान नगरपरिषदेच्या मुख्याधिका-यांकडे २०१७ रोजी दिले असून यासाठी ते सातत्याने पाठपुरावा करत असून वनखात्याच्या अधिकारी वर्गाला देखील पत्रव्यवहार केलेला आहे. २०२३ मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी सुद्धा तत्कालीन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे याच मार्गाबाबत पत्रव्यवहार केला होता. मुनगंटीवार यांनी याबाबत संबंधित उप वनविभाग अलिबाग यांच्या कार्यालयाकडे अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार अलिबागच्या कार्यालयाकडून वन परिक्षेत्र माथेरान कर्जत आणि मुख्याधिकारी माथेरान यांना मुनगंटीवार यांच्या आदेशाबाबत तातडीने अहवाल पनवेल कार्यालयात सादर करण्यात यावा, असे सूचित करण्यात आले होते.

तसेच, रामबाग रस्ता माथेरानच्या दक्षिणेला असल्यामुळे उत्तर दिशेला असलेल्या दस्तुरी पार्किंग ठिकाणी होत असलेले पर्यटकांचे, घोड्यांचे, रिक्षांचे, वाहनांचे विकेंद्रीकरण शक्य होईल. त्यामुळे साहजिकच दस्तुरी येथील पार्किंगची समस्या संपुष्टात येईल. रामबाग रस्त्याच्या पायथ्याशी अंदाजे सहा ते आठ किमी अंतरावर पोखरवाडी आदिवासी वाड्याचे जंक्शनचे ठिकाण आहे. येथूनच कर्जत-बोरगाव-पोखरवाडी मार्गे ताडवाडी अशी शासनमान्य एसटी या डांबरी रस्त्यावरून येते. या रस्त्यामुळे मुंबई पुणे येथील अंतर २५ किलोमीटर ने कमी होऊन वेळ, पैसा, इंधन बचतीचा उत्तम मार्ग आहे.

# कामगार विभाग राज्यात अव्वल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाने १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स व सेवाकर्मी पुरस्कार कार्यक्रम शासकीय विभाग, संचालक, आयुक्तालय, क्षेत्रीय कार्यालय इत्यादींसाठी जाहीर केला. यामध्ये ३ हजारपेक्षा कमी मंजूर पदसंख्या असलेल्या विभागांच्या प्रकारात २०० गुणांपैकी १८५ गुण मिळवित कामगार विभाग राज्यात अव्वल ठरला आहे. विशेष प्रशंसनीय वर्गवारीमध्ये विभागाला स्थान मिळाले आहे.

कार्यालयीन मूल्यमापनात १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रम अंतर्गत राज्यातील ६८ सर्वोत्तम आयुक्त, संचालक प्रकारात कामगार विभागअंतर्गत कार्यरत बाष्पके संचालनालयाने चौथा आणि कामगार आयुक्तालयाने पाचवा क्रमांक पटकाविला आहे. विभागाच्या या उल्लेखनिय कामगिरीबद्दल कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दालनात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा सत्कार करीत त्यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी अधिकाऱ्यांनीही विभागप्रमुख म्हणून कामगार मंत्री यांचा सत्कार केला. यावेळी कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच.पी तुम्मोड, उपसचिव दिपक पोकळे, उपसचिव स्वप्नील कापडणीस, उपसचिव रोशनी कदम, बाष्पके संचालनालयाचे संचालक गजानन वानखडे आदी उपस्थित होते.

# मुंबई अग्निशमन दलाकडून पुनर्जतन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुंबई अग्निशमन दल आपल्या अविरत सेवेसाठी भारतासह जगभरात प्रसिद्ध आहे. मुंबई अग्निशमन दलाच्या गौरवशाली इतिहासात ऐतिहासिक ‘टर्न टेबल शिडी’ वाहनाची मोलाची भूमिका आहे. या ‘टर्न टेबल शिडी’प्रमाणे मुंबई अग्निशमन दलातील ऐतिहासिक यंत्र आणि अवजारांचे जतन करून त्यांचे संग्रहालय करता येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



सन १९३७ मध्ये निर्मित आणि सन १९४४ मध्ये मुंबई बंदरात (मुंबई डॉक) एस. एस. फोर्ट स्टिकिन या मालवाहू जहाजाला लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी मोलाची भूमिका बजावणाऱ्या ‘टर्न टेबल शिडी’ असलेल्या वाहनाचे मुंबई अग्निशमन दलाकडून पुनर्जतन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक वाहनाचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी (दि.२६) प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथे अनावरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे, पद्मश्री पुरस्कार सन्मानित आर्मिडा फर्नांडीज, उद्योजक गौतम सिंघानिया, मुंबई अग्निशमन दलाचे प्रमुख अग्निशमन अधिकारी रवींद्र आंबुलगेकर आदींसह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## रोहिदास महाराजांच्या जयंती महोत्सवाचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत रोहिदास महाराज यांच्या ६५०व्या जयंती महोत्सवाचा भव्य शुभारंभ सोहळा दि.१ फेब्रुवारी रोजी दादर येथील राजा शिवाजी विद्या संकुलात संपन्न होणार आहे. संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती महोत्सव समिती व चर्मकार समाजाच्या विविध संघटनांच्या विद्यमाने या नेत्रदीपक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

संत रोहिदास यांनी आपल्या संस्कृतीला योग्य दिशा देण्याचे काम आयुष्यभर केले असल्यामुळे, जयंती महोत्सवाचे कार्यक्रम सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने व्हावेत ही देखील चर्मकार समाजाची मागणी होती; त्याप्रमाणे हा जयंती महोत्सवाचा पहिला कार्यक्रम सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने होत असल्याने समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुंबई महानगर व आजूबाजूच्या शहरातून मोठ्या प्रमाणात चर्मकार बांधव सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. संत रोहिदास चौक परळ एसटी डेपो येथून शोभा यात्रा दादर येथील राजा शिवाजी विद्या संकुल या कार्यक्रम स्थळी निघणार आहे.

# कृषीमंत्र्यांकडून लाड यांचे अभिनंदन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या देशातील चार मान्यवरांची पद्म पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. शेती, रेशीम उत्पादन, कापूस संशोधन तसेच पशुपालन व दुग्धव्यवसाय या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाल्याचे भरणे यांनी म्हटले आहे. उत्तर प्रदेश, आसाम, महाराष्ट्र आणि तेलंगणा येथील शेतकरी व पशुपालकांचा या यादीत समावेश असून, त्यांच्या कार्यामुळे देशभरातील शेतकरी वर्गाला प्रेरणा मिळत आहे.


महाराष्ट्रातील प्रगतीशील शेतकरी आणि कृषी नवोन्मेषक श्रीरंग देवाबा लाड यांची पद्म पुरस्कार २०२६साठी निवड करण्यात आली आहे. ‘दादा लाड कापूस तंत्र’ विकसित करून त्यांनी कापूस उत्पादनात क्रांतिकारी बदल घडवून आणला. या तंत्रज्ञानामुळे बियाणे कापसाचे उत्पादन सुमारे ३०० टक्क्यांनी वाढले असून हजारो शेतकऱ्यांचे उत्पन्न ४० टक्क्यांहून अधिक वाढले आहे. कमी खर्चात अधिक उत्पादन आणि शाश्वत शेती हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य उद्देश राहिला आहे.

## काकांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय धडे

अजितदादांचा जन्म हा अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यामधील देवळाली येथे २२ जुलै १९५९ रोजी झाला. १९८२ मध्ये त्यांनी स्थानिक राजकारणात प्रवेश केला. त्यांनी काका शरद पवार यांच्या नेतृत्वात राजकीय धडे गिरवायला सुरुवात केली. शरद पवार यांच्या अनेक निर्णयाचे ते साक्षीदार होते. शरद पवार यांच्यासोबत त्यांनी अनेक पदांवर काम केले. १९९३ साली शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री झाले. तेव्हा अजितदादांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले. त्यांनी वित्त, नियोजन, ऊर्जा, जलसंपदा, ग्रामीण विकास यासह अनेक खाती सांभाळली.

## आज अजित पवारांवर अंत्यसंस्कार

गुरुवारी सकाळी ९ वाजता गदिमा सभागृहापासून अंत्ययात्रेला सुरुवात होणार आहे. ही यात्रा विद्या प्रतिष्ठान चौक आणि भिगवण रोड सेवा रस्त्यावरून मार्गक्रमण करेल. यानंतर सकाळी ११ च्या दरम्यान विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर संपूर्ण शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडणार आहेत. यावेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातील अनेक बडे नेते उद्या बारामतीत अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी हजर राहणार आहेत.







# दादा गेले



● राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याने तीन दिवस शासकीय दुखवटा पाळला जाणार आहे. यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आला आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

## महाराष्ट्र शोकसागरात


### विमान अपघातात मृत्यू झालेले



अजित पवार, उपमुख्यमंत्री



सुमित कपूर, पायलट कॅप्टन



विदीप जाधव, मुंबई पीएसओ एचसी



पिंकी माळी, फ्लाईट अटेंडंट



संभवी पाठक, कॅप्टन

- **विमान उतरल्यानंतर बोलू :** अजित पवारांनी भाजप आमदाराला शेवटचा फोन केला. अजित पवार यांचे पुतणे आणि भाजप आमदार रणजगजितसिंह पाटील यांनी सांगितले की, अपघातापूर्वी अजित पवारांनी त्यांच्याशी फोनवर चर्चा केली होती. विमानात चढण्यापूर्वी अजित पवार यांनी रणजगजित सिंह यांना विमानात उतरल्यानंतर त्यांच्याशी बोलू, असे सांगितले होते.
- **लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी :** सकाळच्या धुक्यामुळे दृश्यमानता कमी होती. वैमानिकांनी बारामती विमानतळाच्या रनवे-११ वर उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला धावपट्टी पाहता आली नाही. दोन्ही वैमानिकांनी विमान पुन्हा वर घेतले.
- **पायलटने लँडिंग क्लिअरन्सची पुष्टी केली नाही:** दुसऱ्यांदा विमान पुन्हा धावपट्टीजवळ येऊ लागले. पायलटने सांगितले की, आता धावपट्टी दिसत आहे. यानंतर, विमानाला लँडिंगची परवानगी देण्यात आली; परंतु महत्त्वाची गोष्ट म्हणजे पायलटने या परवानगीचा रीडबॅक दिला नाही, म्हणजेच लँडिंग क्लिअरन्सची पुनरावृत्ती आणि पुष्टी केली नाही.
- **धावपट्टीला स्पर्श करण्यापूर्वी विमान दुसऱ्यांदा उलटले :** सुमारे ८:४३ वाजता विमानाशी संपर्क तुटला. विमानाने त्याचे स्थान आणि वेग दर्शविणारे सिग्नल पाठवणे थांबवले. ते जमिनीला स्पर्श करण्यापूर्वीच उलटले आणि धावपट्टीपासून १०० मीटर अंतरावर जमिनीवर कोसळले.
- **विमान जमिनीवर पडताच ४-५ स्फोट झाले :** प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, धावपट्टीवर आदळल्यानंतर विमानाचा स्फोट होऊन आग लागली. यानंतर आणखी ४-५ स्फोट झाले.
- **आगीमुळे मदतकार्यात अडथळा :** विमानतळावरून आग आणि धुराचे लोट पाहून स्थानिक लोकांनी अपघातस्थळाकडे धाव घेतली. गावकऱ्यांनी विमानातील लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण आग इतकी भीषण होती की त्यांना मदत करता आली नाही.
- **प्रत्यक्षदर्शी म्हणाले – अपघात होईल असे आधीच वाटले होते :** अपघातापूर्वी बारामती विमानतळाजवळील गावातील अनेकांनी विमान पाहिले. एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, विमान धावपट्टीवर पोहोचण्यापूर्वी सुमारे १०० मीटरवर कोसळले. विमान उतरत असताना अपघात होईल असे वाटत होते आणि तसे झाले.
- **घरापर्यंत विमानाचे तुकडे पडले :** दुसरा गावकरी म्हणाला विमान आधी गावावरून गेले. त्यानंतर तो गावात उतरताना दिसला. यानंतर ते धावपट्टीवर पलटी होऊन जमिनीवर कोसळले. स्फोटानंतर विमानाचे तुकडे उडून आमच्या घराच्या दिशेने पडले

विमान कोसळण्यापूर्वी कॅप्टन सुमित कपूर यांनी एअर ट्रॅफिक कंट्रोलला (ATC) मेडे, मेडे, मेडे असं म्हणत सिग्नल दिला होता. त्यावेळी त्याने काहीतरी तांत्रिक अडचण झाल्याचे सांगितले होते. हा सिग्नल म्हणजे वैमानिकाने मदतीसाठी मारलेली शेवटची हाक असते. हा शब्द फ्रेंच भाषेतील आहे. याचा अर्थ, या आणि मला मदत करा असा होतो. जेव्हा विमानाचे इंजिन निकामी होते, विमानात आग लागते किंवा विमान क्रॅश होण्याची भीती असते, तेव्हा वैमानिक रेडिओवर तीन वेळा ''मेडे, मेडे, मेडे'' असा संदेश देतो.

विमान उतरवण्याची परवानगी देण्यात आली, पण मेडे कॉल मिळताच, एटीसी इतर सर्व विमानांचे संपर्क थांबवून केवळ संकटात असलेल्या विमानाला प्राधान्य देते. धावपट्टीवर अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका तैनात केल्या जातात. विशेष म्हणजे, ज्यावेळी मेडे कॉल देण्यात आला, तेव्हा बारामतीमध्ये धावपट्टी मोकळी होती. त्यामुळे विमान उतरवण्याची परवानगी देण्यात आली होती. पण, एटीसीने परवानगी देऊनही विमानातील बिघाड इतका मोठा होता की पायलटला सुरक्षित लँडिंग करता आले नाही. या दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेता AAIB ( Aircraft Accident Investigation Bureau) ने तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' सापडल्यानंतर तांत्रिक बिघाडाचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे.



**सुनेत्रा पवारांना अश्रू अनावर...** अजित पवार यांच्या निधनाची बातमी मिळताच राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुःख व्यक्त केले. त्यांनी विद्या प्रतिष्ठान येथे अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार यांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी सुनेत्रा पवार यांना अश्रू अनावर झाले.



अलिबाग येथील कार्यक्रमातील आठवणीचा क्षण.

## शेकापच्या प्रचार सभा रद्द; जयंत पाटील बारामतीकडे रवाना

राज्यासह जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी प्रचार सभा सुरु झाल्या आहेत. शेतकरी कामगार पक्ष महाविकास आघाडीच्यावतीने बुधवारी अलिबाग तालुक्यासह अनेक तालुक्यांत सभांचे आयोजन करण्यात आले होते. शेकापचे नेते सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा होणार होत्या. परंतु, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि.२८) सकाळी विमान अपघातामध्ये निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शेकापचे नेते जयंत पाटील यांनी त्यांच्या सर्व बैठका, सभा रद्द केल्या आहेत. शेकापमार्फत असणाऱ्या सर्व प्रचार सभा रद्द करण्यात आल्या आहेत. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच शेकाप सरचिटणीस जयंत पाटील हे बारामतीकडे रवाना झाले. अजित पवार यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, माजी आ. बाळाराम पाटील आदी शेकापचे नेते बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे पोहोचले.

## काकांसाठी खासदारकीचा राजीनामा

१९९१ साली अजितदादांना काँग्रेसने खासदारकीचं तिकीट दिलं. सर्व उमेदवारांची अगोदर घोषणा झाली. ऐन शेवटच्या टप्प्यात अजितदादांना खासदारकीचं तिकीट देण्यात आलं. त्यावेळी पृथ्वीराज चव्हाण आणि अजितदादा पवार हे निवडून आले. पुढे हे दोघे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात एकत्रित होते. पण, राजीव गांधी यांच्या हत्येनंतर पी.व्ही. नरसिंह राव यांच्याकडे देशाचे नेतृत्व आले. त्यांनी तातडीने शरद पवार यांना संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी दिली. संसद सदस्यत्वासाठी मग बारामती मतदारसंघ सुरक्षित होता. काकांसाठी दोन-तीन महिन्यांपूर्वी निवडून आलेले अजितदादा यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर लागलीच त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवली आणि ते विजयी झाले.

## असंख्य कार्यकर्ते बारामतीकडे रवाना

राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या निधनाने राज्यासह रायगड जिल्ह्यातदेखील शोककळा पसरली आहे. गुरुवारी (दि. २९) सकाळी अकरा वाजता, बारामती येथे पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत. अजित पवार यांच्या निधनाची माहिती समजताच रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते बारामतीकडे रवाना झाले आहेत. त्यामध्ये अ‍ॅड. प्रवीण ठाकूर, अमित नाईक, चारू मगर, हर्षल पाटील आदी राष्ट्रवादीचे जिल्हा, तालुक्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते रवाना झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## देशभरातून शोक व्यक्त

### अजितदादांचे महाराष्ट्र, देशाच्या विकासात मोठे योगदान : पंतप्रधान नरेंद्र मोदी

अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. या अपघाताने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि काही मित्रांना आपल्यापासून दूर नेले आहे. अजितदादांनी महाराष्ट्र आणि देशाच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. त्यांनी नेहमीच सक्रियपणे काम केले. अजित पवार यांच्या कुटुंबियांबद्दल मी माझ्या संवेदना व्यक्त करतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### कधीही भरून निघणारी हानी : राष्ट्रपती मुर्मू

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली, त्यांच्या मृत्यूला अकाली निधन म्हटलं आणि महाराष्ट्राच्या विकासातील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल त्यांचे स्मरण केलं. ''महाराष्ट्रातील बारामती इथं झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक लोकांच्या मृत्यूची बातमी अत्यंत दुःखद आहे. अजित पवारजी यांचं अकाली निधन ही एक कधीही भरून न येणारी हानी आहे. महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकार क्षेत्रात दिलेल्या त्यांच्या विशेष योगदानाबद्दल त्यांना नेहमीच स्मरणात ठेवलं जाईल,'' असं राष्ट्रपतींनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. ''मी त्यांच्या कुटुंबियांना, समर्थकांना आणि चाहत्यांना माझ्या संवेदना व्यक्त करते. या अपघातात ज्या इतरांनी आपले प्राण गमावले, त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो,'' असंही त्या पुढे म्हणाल्या.

### दिलदार मित्र सोडून गेला : देवेंद्र फडणवीस

अजित पवार हे महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्राच्या प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता. अजित दादा हे संघर्षातून तयार झालेले नेतृत्व होते. कोणत्याही परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारे व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राकरिता आजचा दिवस अतिशय कठीण आहे. कधही भरुन न निघणारे नुकसान महाराष्ट्राचे झाले आहे. अशा प्रकारचे लोकनेते गेल्यानंतर जी पोकळी निर्माण होते, ती भरुन काढणे कठीण आहे. अतिशय संघाच्या काळात आम्ही सोबत काम केलेले आहे. या गोष्टीवर विश्वास ठेवायलाच मन तयारच होत नाही. माझा दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### मोठा भाऊ हरपला : एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मला माझा मोठा भाऊ हरपल्याचे दुःख झाले आहे, अशी भावना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. अजित पवार वयाने मोठे होते. आम्ही राजकारणात एक टीम म्हणून काम करत असलो तरी, एक मोठा भाऊ हरपल्याची भावना माझ्या मनात निर्माण झाली आहे.

### अजितदादा, निर्भीड अन् स्पष्टवक्ता : गोगावले

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा बारामतीजवळ विमान अपघातामध्ये झालेल्या मृत्यूने संपूर्ण राज्यावर संकट कोसळले असून, एक निर्भीड व स्पष्ट व्यक्तिमत्त्व आपल्यातून हरपल्याची भावना राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी आपल्या शोकसंदेशांमध्ये व्यक्त केली आहे. असा दुर्दैवी मृत्यू कोणाच्या आयुष्यात येऊ नये. मात्र, विधीलिखित कोणी टाळू शकत नाही. मी तमाम जनतेच्या वतीने अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, अशा शब्दात मंत्री भरत गोगावले यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### राज्याचे झुंजार नेतृत्व हरपले : स्नेहल जगताप

राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार यांचे विमान दुर्घटनेमध्ये निधन झाले, ही बातमी मनाला वेदना देणारी आहे. राज्याचे झुंजार नेतृत्व हरपले असल्याची भावना महाड विधानसभा मतदार संघाच्या नेत्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांनी शोक संदेशाद्वारे व्यक्त केली. माझ्या वडिलांच्या दुःखद निधनानंतर जेवढ्या दुःखद वेदना झाल्या, त्याचप्रमाणे आज अजितदादा यांच्या जाण्याने झाल्या आहेत. महाराष्ट्रचे दादा सर्वांना पोरके करून गेल्याची भावना स्नेहल जगताप यांनी व्यक्त केली.

# उमद्या लोकनेत्याचा घात

अविश्वसनीय.. अकल्पित... धक्कादायक... दुर्दैवी.. अकाली... अजितदादांच्या अपघाती मृत्यूला अशी कितीतरी विशेषणे लावता येतील. सर्व मराठी जनतेला हादरा देणारा व चटका लावून जाणारा असा हा काळाचा घाला होता. एक घाव दोन तुकडे अशी अजितदादांची बोलण्यावागण्याची शैली होती. त्यांचे राजकारणही बऱ्याच अंशी तसेच होते. तडकाफडकी निर्णय घेणे व ते अमलात आणणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या राजकारणाचा प्रवास तशाच तडकाफडकी रीतीने थांबावा हे त्यांचेच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्राचेच दुर्दैव आहे. अजितदादांचे राजकारण सर्वांनाच मान्य होईल असे नव्हते. त्यांच्यावर अनेक प्रकारचे आरोप वेळोवेळी झाले. मात्र लोकांच्या प्रश्नांबद्दलची त्यांना असलेली जाण, तात्काळ निर्णय घेऊन तो अमलात आणण्याची त्यांची धडाडी आणि त्यांचे कर्तेपण हे त्यांचे विशेष सर्वांनाच मान्य होते. बुधवारच्या अपघातानंतर सर्व पक्षांचे कार्यकर्ते व नेते यांच्यामध्येच नव्हे तर सर्वसामान्यांमध्ये जी एक शोकलहर उसळली ती दादांच्या लोकनेतेपणाची निदर्शक होती. विरोधकांनाच नव्हे तर सामान्य लोकांनाही दादांचे अनेक निर्णय पटले नव्हते. त्याबद्दल त्यांच्यावर चौफेर टीका झाली होती. पण तरीही सरकारी जंजाळामध्ये दादा हेच एक कामाचे माणूस आहेत याची पक्की खात्री सर्वांना होती. प्रचंड टीका सहन करूनही दादांची दिलेर व दिलदार वृत्ती कधी आटली नाही. त्यामुळेच त्यांच्याभोवती पक्षाच्या कार्यकर्त्यांचाच नव्हे तर परपक्षांच्या नेत्यांचाही गोतावळा जमत असे. अजितदादा शेवटपर्यंत उपमुख्यमंत्रीच राहिले. मुख्यमंत्री होण्याचे त्यांचे स्वप्न कधीच पूर्ण होऊ शकले नाही. याबद्दल महाराष्ट्राने तर त्यांची चेष्टा केलीच, पण खुद्द दादांनीही स्वतःवर अनेकदा विनोद केले. त्यांच्या या खेळकर वृत्तीमुळेच सामान्य माणसांना त्यांच्याबद्दल कधी द्वेष निर्माण झाला नाही. उलट ते आपलेसे वाटले व काल त्यांच्या निधनानंतर एक चांगला नेता गेला अशीच भावना सर्वत्र निर्माण झाली. दादांच्या राष्ट्रवादीचा अलिकडेच पालिका निवडणुकीत दणकून पराभव झाला. पण तरीही खचून न जाता त्याच दिवसापासून त्यांनी जिल्हा परिषदांसाठी मोर्चेबांधणी सुरु केली होती. अशी न हरता पुन्हा तडफेने उभे राहणारे नेते कार्यकर्त्यांना व जनतेला आवडतातच. दादा हे त्यापैकीच एक होते.

## स्वतःची ओळख

आपले काका शरद पवार यांच्या राजकारणाचा भक्कम वारसा दादांना मिळाला हे खरे आहे. पण म्हणून दादांचे यश हे कष्ट न करता, आपोआप मिळालेले नव्हते. पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेपासून त्यांनी उमेदवारीला सुरुवात केली. या बँकेच्या कामाला शिस्त लावून ती फायद्यात आणून दाखवली. आपल्या अखत्यारीतील सहकारी साखर कारखाने व संस्था यादेखील कार्यक्षमपणे व पारदर्शकपणे चालवल्या पाहिजेत यावर त्यांचा कटाक्ष होता. लोकांच्या पैशांचा कुठेही दुरुपयोग होऊ नये व जे भांडवल घालू त्याचा परतावा मिळायलाच हवा हे त्यांचे दोन आग्रह मोलाचे होते. पुढे प्रदीर्घ काळ अर्थमंत्री म्हणून त्यांनी आपल्या कामाचा जो ठसा उमटवला त्याचेही कारण तेच होते. खात्यातील नियमांची बारकाईने माहिती, नियमात प्रकरणे बसवण्याचे कसब, अधिकाऱ्यांवर वचक याबद्दल त्यांच्या संदर्भात अनेकदा लिहिले गेले आहे. शरद पवार यांचे नेतृत्व बहुमुखी होते. साहित्य, संस्कृती, उद्योग, खेळ अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले होते. अजितदादांना या संदर्भात काही मर्यादा होत्या. खुद्द त्यांनाही त्याची जाणीव होती. पण कोणत्याही प्रश्नावर व्यवहार्य तोडगा काढण्याचे पवार यांचे कसब त्यांनी अचूक उचलले होते. शिवाय, पूर्ण महाराष्ट्राची खडा न् खडा माहिती असणारा, विविध प्रश्नांची जाणीव असणारा अशीही त्यांची ओळख होती. त्यातूनच काकांच्या प्रतिमेचा दबाव न घेता त्यांनी तरुण कार्यकर्त्यांमध्ये स्वतःची दुसरी फळी तयार केली. त्यामुळेच राष्ट्रवादी फोडण्याची वेळ आली तेव्हा हे सगळे सवंगडी त्यांच्यासोबत उभे राहिले. काकांच्या राष्ट्रवादीने २०२४ च्या लोकसभेला दादांना जोरदार शह दिला. दादांचे विधानसभेला कसे होणार असेच सर्वांना वाटू लागले. पण विधानसभेला त्यांनी जबरदस्त मुसंडी मारून सर्वांना चकित केले. याच रीतीने पुण्याच्या पालिका निवडणुकीत हरले असले तरी खेड्यापाड्यातल्या राजकारणात अजूनही आपलाच शब्द चालतो हे दाखवण्याच्या ईर्षेने ते पुढे चालू लागले होते. त्याच वेळी अवचितपणे त्यांचा प्रवास थांबला.

## कामाचा माणूस

पहाटेपासून कामाला लागणे हे दादांचे वैशिष्ट्य होते. ते अधिकाऱ्यांना सकाळी सहा वाजल्यापासून बैठकांसाठी बोलावून घेत. पत्रकारांनाही भल्या सकाळी मुलाखतीच्या वेळा देत असत. स्पष्टवक्तेपणा व कामाचा उरक याबाबत ते कोणालाही हार जाणारे नव्हते. मला मते दिलीत तरच तुमच्या भागाला पैसे देईन अशी धमकी ते खुलेपणाने आपल्याच मतदारांना देत. लोकही हसून खेळून ती ऐकून घेत. अर्थात, मते दिली नाहीत म्हणून खुनशीपणे एखादे काम रोखून धरणे असे त्यांनी केले नाही. प्रदीर्घ काळ ते काकांच्या सावलीत वावरले. पण एका टप्प्यानंतर त्यांना भाजपच्या विरोधात राहण्याचे काकांचे राजकारण मानवेनासे झाले. सत्तेत राहिलो तरच आपण विकास करू शकतो असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे भाजपची विचारसरणी मनापासून मान्य नसतानाही एक तडजोड म्हणून त्याच्यासोबत गेले. पण नागपूर अधिवेशनादरम्यान ते वा त्यांचे आमदार कधीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात हजेरी लावायला गेले नाहीत. भाजपने नबाब मलिकांना देशद्रोही ठरवले तरीही पालिका निवडणुकीची सूत्रे दादांनी नबाब यांच्याकडेच दिली. त्यांची साथ सोडली नाही. मुस्लिम, दलित यांना सोबत घेण्याबाबत ते आग्रही राहिले. सिंचनामधले ७० हजार कोटींचा घोटाळा, सहकारी कारखाने विकत घेणे किंवा अलिकडचे पुण्यातले मुलगा पार्थचे महार वतन जमिनीचे प्रकरण हे त्यांच्या कारकीर्दीवरचे डाग म्हणता येतील. पण यात आरोप किती, धुरळा किती व सत्य किती हे नीटपणे कधीही बाहेर आले नाही. दादांच्या चुकीच्या वक्तव्यांमुळे काही वेळा वाद निर्माण झाले. पण त्याबद्दल यशवंतरावांच्या समाधीपाशी जाऊन माफीही त्यांनी मागितली. ही पश्चात्तापाची भावना खोटी नव्हती. अलिकडे त्यांनी आपल्या तडकफडक बोलण्यावर बराच आळा घातला होता. पत्रकार परिषदेत व सभांमध्येही ते विनोद करू लागले होते. मध्यंतरी त्यांनी आपली प्रतिमा बदलण्यासाठी दिल्लीच्या एका संस्थेच्या मदतीने खास प्रयत्न चालवले होते. पण हे सर्व बाह्य उपचार आहेत. आपले काम हेच आपले खरे सामर्थ्य आहे याचे त्यांचे भान कधीही सुटले नाही. त्यामुळे शेवटपर्यंत पायाला भिंगरी राहून लोकांमध्ये फिरणे त्यांनी सोडले नाही. कोरोनाच्या काळात नियमितपणे मंत्रालयात येणारे ते एकमेव मंत्री होते. अजितदादांची राजकीय संगत कशीही असली तरी त्यांचा स्वतःचा कारभार कायम जनताभिमुख होता. ६६ हे काही जाण्याचे वय नाही. राजकारणात तर नाहीच. त्यांच्याकडून महाराष्ट्राला खूप काही मिळू शकले असते. पण ते अचानक संपले. कृषीवल परिवारातर्फे अजितदादांना श्रद्धांजली.

**विचार**

# राजकारणापलिकडचे ‘दादा’

***महाराष्ट्राच्या राजकारणावर वेगळा ठसा उमटवणारा नेता अशी अजितदादांची ओळख होती. मोठ्या झाडाखाली छोटी झाडे तगत नाहीत; परंतु अजितदादा त्याला अपवाद होते. राज्याच्या प्रश्नांची खडानखडा माहिती आणि दूरदृष्टीने निर्णय घेणारा झुंजार नेता म्हणून त्यांची ओळख होती. दुर्दैवी विमान अपघातात त्यांचा अंत झाला. मुख्यमंत्री व्हायचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाले नाही, ही रूखरूख महाराष्ट्राला राहील.***

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राजकीय वारसा लाभला असला, तरी ते त्या माध्यमातून राजकारणात आले नाहीत. राजकारणी अजितदादा सर्वांना माहीत आहेत; परंतु त्या पलीकडचे अजितदादा अनेकांना माहीत नाहीत. नगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरामध्ये त्यांचा जन्म झाला. अण्णा पाटील कदम हे त्यांचे मामा. दादा राजकारणात कुठेही असले, तरी त्यांनी नातेसंबंध कटाक्षाने जपले. नगर जिल्ह्यात आले, की ते आजोळी जायचे. वेळात वेळ काढून त्यांना भेटायचे. विचारपूस करायचे. विरोधी पक्षात असले, तरी अजितदादांनी राजकारण आणि नातेसंबंध वेगळे ठेवले. अन्य कुणाशी नातेसंबंध असले, तरी त्यांच्याही भेटी अजितदादा घेत. अजितदादा राजकारण्यापेक्षा माणूस म्हणून मोठे होते. अगदी अलिकडचे उदाहरण म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीकडे पाहता येईल. प्रचारासाठी जात असताना त्यांनी एक अपघात पाहिला तेव्हा तिथे थांबून अपघातातील जखमीला तातडीने रुग्णालयात पाठवले. हे अपवादात्मक उदाहरण नाही. नगर जिल्ह्यात एका अपघातातील जखमीसाठी स्वतःची गाडी थांबवली. त्या गाडीतच रुग्णाला दवाखान्यात पाठवून उपचाराची व्यवस्था केली आणि दादा दुसऱ्याच्या गाडीत पुढे निघून गेले. दादा असे माणुसकी जपणारे होते.

दादा उपमुख्यमंत्रीपदी असताना वाढदिवसादिवशी त्यांच्या मुंबईच्या बंगल्यावर जाण्याचा योग आला. सकाळी साडेसहा वाजता तिथे पोचलो, तर दादा एका बैठकीत होते. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आमच्यासोबत विदर्भातील काही कार्यकर्ते ही आले होते. त्यांची काही सार्वजनिक कामे होती. दादांनी त्यांच्या आमदाराकडून ती जाणून घेतली आणि आमदारालाच खडसावले. या लोकांना घेऊन इतक्या लांब येण्याची काय गरज होती, त्यांना किती त्रास झाला. त्यांची कामे तिथेच व्हायला हवी होती. त्यानंतर त्यांनी या कार्यकर्त्यांची आस्थेने चौकशी केली. त्यांना नाश्ता दिला. ते कसे आले, याची माहिती घेतली. पैसे आहेत का, हे विचारले. आलाच आहात, तर आता मुंबई पहा आणि गावी जाईपर्यंत तुमचे काम झालेले असेल, असा शब्द दिला. आमदाराला बोलावून संबंधित कार्यकर्त्यांचा खर्च तुम्ही करा, असे बजावले. पैसे नसल्यास माझ्याकडून घ्या, असे सांगायला ते विसरले नाहीत. हे कार्यकर्ते मुंबईहून विदर्भात पोचण्याअगोदरच काम झाले होते. पवार कुटुंबाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेळ चोख पाळणे. अजितदादा त्या परंपरेत बसणारे. अजितदादा दिलेल्या सभांना वेळेवर उपस्थित राहत. अजितदादा स्पष्टवक्ते होते. काम होणार असेल, तरच ‘हो’ म्हणत. होणार नसेल तर तसे स्पष्ट सांगणार. नियमात बसत असेल, तरच काम करणार. नसेल होत तर तसे सांगणार. राजकारणी नेत्यांमध्ये अपवादाने आढळणारा हा गुण अजितदादांकडे होता.



अजित कदम

आज त्यांची आठवण काढताना अनेक वर्षे मागे जायला होते. कोल्हापूर येथून शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर अजितदादांनी काटेवाडीमध्ये शेती करायला सुरुवात केली. प्रारंभी त्यांनी टोमॅटोची लागवड केली. टोमॅटोचे हे पीक पाहण्यासाठी दुरून शेतकरी येत असत. त्यानंतर दादांनी शेतीक्षेत्रात विविध प्रयोग केले. दुधाचा व्यवसाय केला. जनावरांची खरेदी केली. त्या वेळी ते जनावरांसाठी बाजारातून स्वतः कडबा खरेदी करत. याशिवाय त्यांनी कुक्कुटपालन व्यवसायही केला. हे सगळे उद्योग करताना सगळी कामे ते स्वतः करत. दादांनी काटेवाडी ते कन्हेरी परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले. लोकांना मदत करण्याची त्यांची भूमिका आधीपासूनच पहायला मिळालेली. लोकांनी मांडलेले प्रश्न, अडीअडचणी घेऊन ते शरद पवार यांच्याकडे जात. तिथे प्रश्न मार्गी लावत असत. अशा पद्धतीने समाजकारण करता करता अजितदादा राजकारणाच्या वाटेवर येऊन उभे राहिले. वेगवेगळी खाती सांभाळताना अजितदादांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले. दादांचा राजकारणापर्यंतचा प्रवास एक प्रगतशील शेतकरी, लघुउद्योजक, संचालक, अध्यक्ष, उपमंत्री, मंत्री आणि उपमुख्यमंत्री असा टप्प्याटप्प्याने झाला. प्रत्येक पदावर उत्तम काम केल्यामुळे त्यांना पुढची संधी मिळत गेली. प्रत्येक पदाची जबाबदारी सांभाळताना दादांनी त्यांची योग्यता, गुणवत्ता सिद्ध केली. म्हणूनच वारसा म्हणून दादा राजकारणात आले किंवा त्यांना पदं मिळाली असे अजिबात झाले नाही.

अजितदादा आणि कार्यकर्ते हे समीकरण महाराष्ट्राला नव्याने सांगायची गरज नाही. एखादा कार्यकर्ता दादांशी जोडला गेला, तर मग जीव गेला तर बेहत्तर; पण दादांसाठी वाट्टेल ते करण्याची कार्यकर्त्यांची तयारी असे. कार्यकर्त्यांची कानउघडणी करताना दादांचा उद्देश कधीच चुकीचा नसायचा. लोकांची कामे व्हावीत, पक्ष पुढे जावा हेच दादांना अभिप्रेत असायचे. दादा अहोरात्र काम करून जनतेच्या प्रश्नांना महत्त्व देत. कार्यकर्त्यांनी पदावरून भांडणे दादांना पटायचे नाही. म्हणनूच ते थोडा कठोर पवित्रा घेऊन कार्यकर्त्यांना तंबी देत. दादांच्या चिडण्यामागे लोकांची विधायक कामे पूर्ण होण्यासाठीची तळमळ असते, हे कार्यकर्त्यांना चांगलेच ठाऊक असायचे. अजितदादांनी जलसंपदा मंत्री या पदाची धुरा सांभाळताना, कार्यभार पाहताना महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा अत्यंत बारकाईने आणि गांभीर्याने अभ्यास केला होता. यातून भूगर्भातील पाण्याच्या पातळीत होणारी घट आणि त्यातच राहणारी पावसाची अनियमितता यासारखे अनेक प्रश्न समोर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. यावर तोडगा म्हणून धरण बांधकामाची सुरुवात, कॅनॉल, कालवे इत्यादी कामे त्यांनी प्राधान्याने पूर्णत्वाला नेली. याशिवाय ‘पाणी साठवण योजने’यासारख्या योजना राबवल्या. यामुळे पाण्याची अडचण दूर झाली. दादा जितके कठोर, तितकेच मिश्कील होते. फिरक्या घ्यायला ते कमी करत नसतं. गोदावरी खोऱ्याच्या पाण्यावरून नगर-नाशिक विरुद्ध मराठवाडा असा संघर्ष सुरू असताना नाशिक-नगरच्या नेत्यांना ते हसत सांगायचे, की मराठवाड्याला पाणी देऊ द्या. तिथे माझी सासुरवाडी आहे. घरच्यांचं मन जपायला तेवढं तरी करू द्या!

महाराष्ट्रातील विविध पाटबंधारे योजनांना गती देताना ठिबक आणि अनेक नव्या तंत्रज्ञानाच्या बीज प्रक्रियांचे निर्णय त्यांनी घेतले. खोरेनिहाय धरण, पाटबंधारे, पाणलोट यासंदर्भात सर्वांगीण विचार करताना दादांनी धडक कामे मार्गी लावली. अजितदादांच्या राजकारणाचा मोठा भाग हा लोकांच्या आयुष्याशी निगडित होता. तिथे इतर नेत्यांसारखा गरळ ओकण्याचा विषय नसतो. दादा नेहमीच महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस एक करत असत. सत्ता असो वा नसो; दादा अविरत काम करत असत, हे महाराष्ट्राला माहीतच आहे. दादा आणि बळीराजा यांच्यामध्ये एक वेगळ्या प्रकारचे नाते होते. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमध्ये बळीराजाला प्रचंड कष्ट सोसावे लागतात. बळीराजाची ही अवस्था पाहून दादा दुष्काळातील जनतेला दिलासा देण्यासाठी उन्हातान्हात फिरत. त्यातून दुष्काळग्रस्त शेतकरी, पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशा फिरणाऱ्या माता-भगिनी, पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे चिंतेत असणारे छोटे कारखानदार यांना दुष्काळाच्या दुष्टचक्रातून निश्चितच काहीसा आश्चर्यकारक दिलासा देणारा निर्णय दादा तळमळीतून घेत. महिला शिकून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्यास कुटुंबाला उभे करते. त्यामुळे महिला सबलीकरण हा विषय अजितदादांच्या अजेंड्यावर होता. महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ५० टक्के राखीव जागांचा निर्णय दादांच्या पुढाकारातून झाला. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा खूप मोठा निर्णय होता.

बळीराजा, महिला, युवक, दलित, आदिवासी यांचा विकास हा दादांच्या राजकारणाचा गाभा होता. दादांनी या उपेक्षित वर्गासाठी घेतलेले निर्णय त्यांना या वर्गाचा तारणहार म्हणून सिद्ध करतात. दादा स्वतः शेतकरीपुत्र होते. त्यांना शेतकऱ्यांचे दुःख समजत होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच आक्रमक भूमिका घेताना दिसले. कर्जमाफी, नुकसानभरपाई, पीक विमा योजना अशा विषयांवर त्यांनी वेळोवेळी सरकारवर दबाव आणला. त्यामुळे ग्रामीण भागात त्यांची कायम लोकप्रियता राहिली. राजकारणात अनेकदा नेते संभ्रमात राहतात; मात्र अजित पवार यांनी नेहमीच स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली. नेतृत्व म्हणजे सर्वांनाच खूश करणे नसते, तर योग्य वाटणारा मार्ग निवडणे असते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले होते. सरकारी फाईलींचा ढीग न करता निर्णय त्वरित घेणे, अधिकाऱ्यांकडून वेळेत काम करून घेणे हा त्यांचा स्वभाव होता. काही वक्तव्ये, काही निर्णय आणि सत्तासंघर्ष यामुळे ते टीकेचे धनी झाले होते; मात्र त्यांनी कधीही टीकेमुळे काम थांबवले नाही. लोकशाहीमध्ये टीका अपरिहार्य असते. त्यातून शिकत पुढे जाणे, हीच परिपक्व नेतृत्वाची खूण असते. अजित पवार यांनी स्वतःला वेळोवेळी बदलत, सुधारत पुढे जाण्याचा प्रयत्न केला होता. मोठ्या पदावर असूनही त्यांनी जनतेशी असलेला संपर्क तुटू दिला नाही. त्यांच्या वाटचालीत चढ-उतार आले, वाद झाले, टीका झाली; पण काम करण्याची जिद्द मात्र कायम राहिली. आजच्या राजकारणात केवळ घोषणांची गर्दी दिसते. प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारे नेते दुर्मिळ होत चालले आहेत. त्यात अजित पवार होते. दुर्दैवाने आज ते आपल्यात नाहीत.

**चर्चा आजची**

# महाराष्ट्राने धडाडीचे नेतृत्व गमावले

बुधवारी सकाळी मन सुन्न करणारी घटना घडली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाले. ही माहिती सर्वत्र पसरताच कुटुंबियांसह सर्व राजकीय पक्ष, कार्यकर्ते, विरोधक आणि सर्वसामान्य जनता सुन्न झाली. ही एखादी अफवा तर नसेल ना, असे प्रश्न सर्वांसमोर उभे राहत होते. मात्र, वेळेचे काटेकोरपणे पालन करणाऱ्यासाठी वेळच थांबली नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादांच्या अकाली निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक व सुन्न करणारी आहे. स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर मजबूत पकड, जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण आणि ते सोडवण्याची क्षमता असलेल्या दादांच्या निधनाने महाराष्ट्राने धडाडीचे कर्तबगार व लोकाभिमुख नेतृत्व गमावले, अशी भावना राजकीय नेत्यांसह सर्वसमान्य जनतेत पसरली आहे.

अजित पवार हे व्यक्तीमत्त्व शुन्यातून उभं राहिलेलं आहे. त्यांना राजकिय वारसा असतानाही त्यांनी राज्यात स्वतःच्या कामगिरीवर आपलं अस्तित्व निर्माण केलेलं. त्यांनी तब्बल सहावेळा राज्याचं उपमुख्यमंत्रीपद भुषवलं आहे. दिवसाचे १६-१७ तास सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध राहून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आव्हान लीलया पेलणारे, सातत्याने गेली ३ दशके महाराष्ट्रासारख्या राज्याच्या राजकीय-सामाजिक जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या या नेतृत्वाकडे असलेली सर्वांगीण दुरदृष्टी थक्क करणारे, महाराष्ट्राच्या राजकारणात वक्तशीरपणासाठी प्रसिद्ध असलेले ‘दादा’ आज आपल्यात राहिले नाहीत, हे सर्वसामान्यांना पचवणं कठीणचं. अजित पवार हे नाव गेल्या काही वर्षांपासून चर्चेचा विषय बनले होते. अनेक घडामोडी घडल्या. त्यात त्यांनी पटणारे आणि न पटणारे काही निर्णय देखील घेतले. मात्र, त्यांनी न डगमगता खंबीरपणे प्रत्येक आव्हान पेलले. त्यांच्यात काकांपेक्षा मोठी धमक असल्याची चर्चा त्यावेळी होत होती. त्यांचा खरा राजकीय प्रवास १९८२ साली सुरू झाला. त्यांनी आपले काका म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे



संतोष राऊळ

अध्यक्ष शरद पवार यांचा हात धरूनच राजकारणात उडी घेतली होती. त्यानंतर त्यांनी १९९१ पासून बारामती विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व केले. त्याच वर्षी ते पहिल्यांदाच लोकसभेवर निवडून गेले होते. त्यानंतर १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९, २०२४ असे सलग सात वेळा ते विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले. त्यांनी महत्वाची खाती देखील शिताफिने हाताळली. विशेष म्हणजे त्यांनी तब्बल सहावेळा उपमुख्यमंत्रीपद भुषवले.अजित दादांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत आमदार, खासदार, विविध खात्यांचे मंत्री तसेच उपमुख्यमंत्री अशा अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आणि प्रत्येक पदाला त्यांनी पूर्ण न्याय दिला. राजकारणासोबतच सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, कला व क्रीडा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. बारामतीसह पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे करून त्यांनी या शहराचा चेहरामोहरा बदलून दाखवला. सर्वसामान्य लोकांची कामे झाली पाहिजेत, हीच त्यांची कायम भूमिका होती. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. अजित दादांची प्रशासनावर मजबूत पकड होती. राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी संस्थात्मक बांधणी केली, नेतृत्वाची पुढील पिढी घडवली आणि सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर विशेष भर दिला. विरोधी पक्षातील नेत्यांशीही त्यांचे सौहार्दपूर्ण संबंध होते. तसेच, अजित दादा हे वेळेचे पक्के होते. कार्यक्रम असो वा राजकीय भेटीगाटी, ते वेळेतच त्या ठिकाणी हजर होत असत. मात्र, त्याच वेळेने त्यांना बुधवारी कायमचे थांबवले. अजित दादा बुधवारी सकाळी ८:१० वाजता आपल्या खासगी विमानातून मुंबईहून बारामतीकडे निघाले होते. आणि सकाळी ८:५० वाजताच्या सुमारास त्यांचे विमान बारामतीत पोहोचताच काळाने घाला घातला. महानगरपालिका निवडणूकीनंतर राज्यात जिल्हा परिषद निवडणूकीची रणधुमाळी सुरू आहे. याच निमित्ताने अजित दादांची बुधवारी बारामती येथे सभा होणार होती. त्यासाठीच ते बारामतीत दाखल झाले होते. परंतु, त्यांचे विमान लँड होत असतानाच भीषण अपघात झाला. यावेळी विमानात अजित दादांसह मुंबई पीसओ, दोन पायलट आणि फ्लाईट अटेंडन्ट यांचा समावेश होता. या भीषण अपघातात या पाच जणांचा मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच संपुर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. ही अफवा तर नाही ना, याची खातरजमा सर्वांनी केली. मात्र, ही अफवा नसुन ही सत्यघटना आहे, हेच पचवणे सर्वांना कठीण गेले. संपुर्ण महाराष्ट्र शोककळेत गेला. याची माहिती मिळताच सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनतेने दादांच्या अंतिम दर्शनासाठी धाव घेतली. अनेकांनी प्रतिक्रिया देखील दिल्या. अजित दादांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी राजकीय हानी झाली आहे. स्व.विलासरावजी देशमुख, गोपीनाथजी मुंडे यांच्याप्रमाणेच अजित दादांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याची भावना संपुर्ण महाराष्ट्रातून उमटत आहे.

**लोकसंसद**

## अरेरे! काळजाला चटका लावून ‘अजितदादा’ गेले

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची दुःखदायक आणि अविश्वसनीय बातमी काळजाला चटका लावून गेली. अजितदादांच्या अकाली निधनामुळे राज्यात सर्वत्र शोककळा पसरली आहे. चांदा ते बांदा अशी महाराष्ट्राच्या संपूर्ण राजकारणाची सखोल जाण असलेल्या राज्यातील काही मोजक्याच नेत्यांपैकी एक असलेल्या अजितदादांनी वयाच्या विशीतच सहकारी कारखान्याच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली होती. त्यानंतर त्यांनी आपले राजकीय गुरू असलेले काका शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणाचे धडे गिरवले आणि राज्याच्या राजकारणामध्ये गेल्या साडेचार दशकांमध्ये राज्यातील एक धडाडीचा नेता व कार्यक्षम व कुशल प्रशासक अशी स्वतःची ओळख निर्माण केली. १९९१ पासून सातत्याने बारामती विधानसभेचे प्रतिनिधित्व करत असताना त्यांनी मंत्रालयात जलसंपदा, अर्थ, नियोजन आणि ऊर्जा यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली. विशेषतः अर्थमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द अधिक उजळून निघाली. मुख्यमंत्रीपदाने त्यांना हुलकावणी दिली असली तरी महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याचे सर्वाधिक सहा वेळा उपमुख्यमंत्रिपद भूषवण्याचा बहुमान त्यांना मिळाला. व्यक्तिमत्वातला रांगडेपणा, स्पष्टपणा, रोखठोकपणा आणि प्रशासनावर मजबूत पकड असलेल्या अजितदादाच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे आणि अनुभवसंपन्न नेतृत्व हरपले आहे. अजितदादांना भावपूर्ण आदरांजली.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**विशेष**

# पगार नव्हे, आत्मसन्मान वाढवणारा नेता

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने राज्याच्या राजकारणातील एक प्रभावी, धगधगतं आणि निर्णयक्षम पर्व संपुष्टात आलं आहे. कडक शिस्त, प्रशासनावर मजबूत पकड, कामात वेग आणि थेट निर्णय घेण्याची क्षमता यामुळे अजित दादा हे केवळ सत्तास्थानावरचे नेते नव्हते, तर संपूर्ण व्यवस्थेला हालचाल देणारे नेतृत्व होते. मात्र या कणखर प्रतिमेआड एक अत्यंत संवेदनशील, माणुसकी जपणारा आणि सामान्य माणसाच्या वेदना समजून घेणारा नेता दडलेला होता, याचा अनुभव अनेकांनी प्रत्यक्ष घेतला.

२०१२ साली आम्ही आमदारांचे स्वीय सहाय्यक (पी.ए.) म्हणून काम करत असताना ही बाब प्रकर्षाने समोर आली. त्या काळात स्वीय सहाय्यकांचे मानधन केवळ ७,८२५ रुपये इतके होते. वाढती महागाई, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि अस्थिर नोकरीची स्थिती यामुळे अनेक जण आर्थिक अडचणीत होते. पगारवाढीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता आणि संबंधित फाईली मंत्रालयात फिरत राहूनही ठोस निर्णय होत नव्हता. हीच फाईल जेव्हा अजित पवार यांच्याकडे आली, तेव्हा नेहमीप्रमाणे प्रशासनाकडून अवघ्या २ ते २.५ हजार रुपयांच्या वाढीचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र हा प्रस्ताव ऐकताच अजित दादांनी तो थेट नाकारला. त्यांच्या खास शैलीत ते म्हणाले, “१० हजारात काय होतं? ही पोरं कुठे जाणार? थेट १५ हजारांचा प्रस्ताव द्या.” हा केवळ आर्थिक निर्णय नव्हता, तर स्वीय सहाय्यकांच्या कामाची दखल घेणारा आणि त्यांच्या सन्मानाची जाणीव ठेवणारा निर्णय होता. या एका निर्णयामुळे स्वीय सहाय्यकांचे वेतन दुप्पट झाले. पण त्याहून मोठा परिणाम मानसिक पातळीवर झाला. कामाला प्रतिष्ठा मिळाली, जगण्याचा आत्मविश्वास वाढला आणि व्यवस्थेत आपल्यालाही कोणी ऐकून घेणारं आहे, ही भावना दृढ झाली. ‘पगार’ वाढला, पण त्यापेक्षा अधिक ‘आत्मसन्मान’ मिळालाहेच अजित दादांच्या नेतृत्वाचं वैशिष्ट्य होतं. अजित दादांचं हे योगदान इथेच थांबलं नाही. पुढील काळातही स्वीय सहाय्यकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली. फडणवीस सरकारच्या काळात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी विधानपरिषदेत स्वीय सहाय्यकांच्या वेतनवाढीचा मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी तत्कालीन अर्थमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनीही या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहत वेतन २५ हजार रुपयांपर्यंत नेण्याचा निर्णय घेतला. या प्रक्रियेत अजित दादांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात अजित पवार यांनी पुन्हा पुढाकार घेत स्वीय सहाय्यकांचे वेतन ३० हजार रुपये करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेताना त्यांनी केवळ आकड्यांचा विचार केला नाही, तर कामाचा ताण, जबाबदाऱ्या आणि स्वीय सहाय्यकांची भूमिका लक्षात घेतली. विशेष म्हणजे, मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात हे वेतन ४० हजार रुपये करण्याचा त्यांचा ठाम मानस होता. आवश्यक त्या प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्या होत्या आणि निर्णय अंतिम टप्प्यात होता. यावर्षी हा निर्णय प्रत्यक्षात आला असता, याबद्दल कुणालाही शंका नव्हती, कारण अजित दादा हे शब्दांचे नव्हे, तर कृतीचे नेते होते. त्यांनी जे सांगितलं, ते करून दाखवण्याचा त्यांचा स्वभाव होता. मात्र नियतीला काही वेगळंच मान्य होतं. या निर्णयाची अंमलबजावणी होण्याआधीच काळाने त्यांना आमच्यातून हिरावून नेलं. त्यामुळे अनेकांच्या मनात अपूर्णतेची हुरहूर छकायम राहिली.

सामान्य माणसाच्या पोटाचा, श्रमाचा आणि सन्मानाचा विचार करणारा, पदापेक्षा माणूस मोठा मानणारा असा नेता आजच्या राजकारणात विरळाच. अजित पवार यांचे हे योगदान केवळ कागदावरचे निर्णय नाहीत, तर हजारो कुटुंबांच्या आयुष्यात बदल घडवणारे ठरले. अजित दादा आज आपल्यात नसले, तरी त्यांच्या निर्णयांची, त्यांच्या संवेदनशीलतेची आणि माणुसकीची छाप कायम राहील.

भावपूर्ण श्रद्धांजली.

**ॲड मंदार शिंगाडे पाटील**
**(भाई जयंत पाटील यांचे स्वीय सहायक)**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२९ जानेवारी

१) श्री.आरती अशोक साष्टे
ब्राम्हणआळी, अलिबाग
२९-१-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**स्व. रुक्मिणी मारुती म्हात्रे, स्मरणार्थ, चिंचवली, नारंगी, अलिबाग**

**कै. सुरेश बाळकृष्ण म्हात्रे, स्मरणार्थ, चौल, अलिबाग**


**कु. अन्वी गौरी अविनाश घाग, वाढदिवस, पुणे**

## वाहतूक सुरक्षेबाबत प्रबोधन

**चिरनेर :** देशातील प्रमुख बंदर असलेल्या न्हावाशेवा वाहतूक पोलिसांच्या वतीने वरीष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या आधिपत्याखाली उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अंतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन व वाहतूक सुरक्षेबाबत चित्रकलेच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. यामध्ये विद्यालयातील १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# लीडार सर्वेक्षणाची माहिती गुलदस्त्यात

## • महानगरपालिकेच्या पारदर्शकतेवर सजग मंचाचे प्रश्नचिन्ह

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
नवी मुंबई महानगरपालिकेला मालमत्ता कर सुधारणांसाठी नुकताच प्रतिष्ठित 'स्कॉच सिल्व्हर पुरस्कार २०२५' प्राप्त झाला आहे. या यशाचा प्रशासनाकडून मोठा गाजावाजा होत असतानाच, दुसरीकडे मालमत्ता मोजणीसाठी राबवण्यात आलेल्या कोट्यवधींच्या लीडार सर्वेक्षणाची माहिती मात्र गुलदस्त्यात ठेवण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पुरस्काराची माहिती उत्साहाने देणाऱ्या पालिकेने २१.८९ कोटींच्या या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल नागरिकांसमोर का ठेवला नाही?, असा रोकडा सवाल सजग नागरिक मंचाने उपस्थित केला आहे.

लीडार सर्वेक्षण प्रकरण : शहरातील मालमत्तांची अचूक मोजणी करण्यासाठी आणि कर महसूल वाढवण्यासाठी महानगरपालिकेने २०१७ मध्ये लाइट डिटेक्शन अ‍ॅड रेंजिंग तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी मेसर्स सेन्सिस टेक लिमिटेड या कंपनीची २१ कोटी ८९ लाख ९५ हजार ५४४ रुपयांना नियुक्ती करण्यात आली. विशेष म्हणजे, ६ मार्च २०१९ रोजी पालिकेच्या तत्कालीन स्थायी समितीने हा प्रस्ताव फेटाळला होता. मात्र, शासनाने विशेष अधिकारांचा वापर करून स्थायी समितीचा निर्णय विखंडित केला आणि प्रशासनाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.

माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२५ पर्यंत या प्रकल्पावर १५ कोटी ५७ लाख ४१ हजार १७६ रुपये प्रत्यक्ष खर्च झाले आहेत. असे असतानाही, या सर्वेक्षणातून नेमक्या किती नवीन मालमत्ता शोधल्या गेल्या, सर्वेक्षणापूर्वी आणि नंतरच्या मालमत्तांच्या संख्येत किती फरक पडला आणि प्रत्यक्षात किती महसूल वाढला, याची कोणतीही अधिकृत आकडेवारी स्कॉच पुरस्काराला प्रसारमाध्यमात व संकेतस्थळावर प्रसिद्धी देणाऱ्या प्रशासनाने लीडर सर्वेक्षणाची माहिती मात्र पालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध केली नाही. तसेच, आरटीआय अंतर्गतदेखील ही माहिती उपलब्ध करून दिली नाही.

स्कॉच पुरस्काराप्रमाणेच लीडार सर्वेक्षणाचे निर्णय, निविदा प्रक्रिया आणि कंपनीसोबतचा करार संकेतस्थळावर अपलोड करावा. सर्वेक्षणाद्वारे तयार केलेले नकाशे, डेटासेट आणि मालमत्ता वाढीचे आकडे नागरिकांच्या माहितीसाठी खुले करावेत, अशी मागणी मंचाने प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

### मंचाच्या मागण्या

सर्वेक्षणादरम्यान नागरिकांनी केलेल्या तक्रारी आणि त्यावर झालेली कारवाई याचा खुलासा करावा. कर महसुलात झालेली वाढ ही केवळ नैसर्गिक वाढ आहे की, लीडार सर्वेक्षणाचा परिणाम, हे प्रशासनाने स्पष्ट करावे.

> ज्या करदात्यांच्या पैशातून २१ कोटींचा प्रकल्प राबवला जातो, त्यांना त्याचे परिणाम जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण खरी पारदर्शकता प्रकल्पाच्या यशापयशाची माहिती जनतेला देणे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहर नियोजनात वैज्ञानिकता आणण्याचा दावा करणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेने, आता लीडार सर्वेक्षणाचे सत्य जनतेसमोर आणून खऱ्या अर्थाने सुशासनाचे दर्शन घडवावे.
> – अरुण कागले, उपाध्यक्ष, सजग नागरिक मंच, नवी मुंबई

## गोखले महाविद्यालयात गणतंत्र दिवस उत्साहात

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचा ७७ वा गणतंत्र दिवस उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे यांच्या हस्ते सकाळी ध्वजपूजन करून ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, एनएसएस स्वयंसेवक तसेच, न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने सामील झाले होते. ध्वजारोहणानंतर प्राध्यापक जावळेकर यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाचे ढोल पथक आणि महिला लेझीम पथकाचा उत्कृष्ट कार्यक्रम पार पडला. यानंतर महिला कराटे प्रात्यक्षिक, मुलांचा मनोरे रचना कार्यक्रम. तसेच विद्यार्थ्यांची परेड, राज्यघटनेची उद्देश पत्रिका सामूहिक वाचन इ. भरगच्च कार्यक्रम झाले या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना विद्यार्थ्यांनी मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपप्राचार्य प्राध्यापक किशोर लहारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक नवज्योत जावळेकर यांनी केले. न्यू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका वैशाली सावंत यांनी सर्वांचे आभार मानले.

## वावे येथे मोफत आरोग्य तपासणी



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील (शिवदत्त मंदिर) वावे गाव येथे रविवारी (दि.२५) सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवा सहज व मोफत उपलब्ध व्हावी, या सामाजिक उद्देशाने हे शिबीर घेण्यात आले.

या आरोग्य शिबिरामध्ये गावातील महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, वजन व उंची मोजमाप तसेच प्राथमिक औषधोपचार करण्यात आले. तपासणीदरम्यान काही रुग्णांना पुढील उपचारांसाठी आवश्यक ते मार्गदर्शनही करण्यात आले.

या उपक्रमासाठी उज्ज्वल होम नर्सिंग सेवा दवाखाना पिंपळभाट येथील डॉ. नितीन गांधी, डॉ. राहुल शर्मा, डॉ. मंजिरी पाटील, रुचिता कदम सिस्टर व अंकुश चंदनशिव कर्मचारी यांच्या सहकार्याने नागरिकांची तपासणी करण्यात आली. या उपक्रमासाठी जय गिरनारी शिवदत्त मंदिर ट्रस्ट रायगड वावेचे अध्यक्ष प्रमोद केणे उपस्थित होते. तसेच स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवक यांनी मोलाचे सहकार्य केले.

## सुवर्णा भगत यांचा सन्मान



**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**
सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रणच्या वतीने शनिवारी (दि.२४) अलिबाग तालुक्यातील मोठे शहापूर येथील सुप्रसिध्द किर्तनकार हरीपाठ सेवा प्रसारक हभप माऊली सुवर्णा राजेंद्र भगत यांना सन्मानित करण्यात आले. श्री हनुमान माघी गणेशोत्सव मंडळ वाघ्रणच्या पाच दिवसीय २९ व्या उत्सवात तिसऱ्या दिवशी झालेल्या किर्तनाच्या कार्यक्रमात मानपत्र शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

मंडळाच्या वतीने आयोजित या किर्तनाला शहापूर धेरंड वाघ्रण परिसरातून असंख्य महिला व पुरुष श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमात सुरुवातीला प्रास्ताविकात नविन वर्षाच्या २० दिवसात झालेल्या सहा दिवंगताना मंडळाचे वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर हनुमान माघी गणेश उत्सव मंडळाचा २९ वर्षांचा आढावा सुत्रसंचलक मंडळ सदस्य सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रणचे अध्यक्ष रायगड भूषण पत्रकार दिपक पाटील यांनी घेतला.

## रांगोळी, भित्तीपत्रके स्पर्धांमधून जनजागृती

**। तळा । प्रतिनिधी ।**
जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदान जनजागृतीसाठी भितीपत्रके व रांगोळी स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मतदानाचे हक्क, लोकशाही आणि जनजागृती या विषयांवर आकर्षक व संदेशात्मक रांगोळ्या साकारल्या. तसेच, भितीपत्रके स्पर्धेत विद्यार्थ्यांनी 'मतदान हेच आपले कर्तव्य', 'लोकशाहीची ताकद मतदार' अशा विषयांवर प्रभावी भित्तीपत्रके सादर केली.

रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक पाटील रिद्धी योगेश, द्वितीय क्रमांक घाडगे तनिषा तुकाराम आणि तृतीय क्रमांक बारटक्के श्रावणी गिरीश या विद्यार्थिनींनी यश संपादन केले. भित्तीपत्रके स्पर्धेत प्रथम क्रमांक शेख खिलकत अबुलहुसैन, द्वितीय क्रमांक खोपटकर फातिमा मन्सूर अहमद आणि तृतीय क्रमांक फटाकरे फातिमा इकबाल या विद्यार्थिनींनी यश संपादन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढली व युवा वर्गात मतदार जागृतीचा संदेश प्रभावीपणे पोहोचला. स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना तळा तहसीलदार मा.स्वाती पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर, राष्ट्रीय मतदार दिन/ माझा भारत माझे मत उपक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेऊन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एन.एम. शेख व डॉ. अभंगे यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सचिन बंगाळे यांचाही तहसीलदार स्वाती पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.




## जेएनपीएमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर यांनी आपल्या परिसरात ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा केला. समारंभाची सुरुवात प्रमुख पाहुणे गौरव दयाल, भा. प्र. से., अध्यक्ष, जेएनपीए यांच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून जेएनपीएचे उपाध्यक्ष रवीश कुमार सिंग, भा.रे.व.से. यांच्या उपस्थितीत मानरक्षक सलामी देऊन करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि राष्ट्रगीताचे गायन झाले. यानंतर अध्यक्षांनी संचलनाची पाहणी केली.



यावेळी समारंभाचा एक भाग म्हणून सीआयएसएफकडून डॉग स्कॉडचे प्रात्यक्षिक तसेच दहशतवादविरोधी कारवाईचे (काउंटर-टेररिझम) सादरीकरण करण्यात आले. या प्रात्यक्षिकांमधून बंदरात कायम ठेवण्यात येणारी सज्जता, सतर्कता आणि सर्वोच्च दर्जाची सुरक्षा व्यवस्था ठळकपणे अधोरेखित झाली. या सादरीकरणांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यात सुरक्षा दलांची असलेली मोलाची भूमिका बजावली.

तसेच, या कार्यक्रमात जेएनपीए शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यासोबतच प्रभावी साहसी (ॲक्रोबॅटिक्स) प्रात्यक्षिक तसेच जेएनपीए फायर टेंडरद्वारे साकारण्यात आले.

**अनेक महाविद्यालयांचा सहभाग** | **तटकरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश**

# पोलादपूर येथे उडान फेस्टिव्हल उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित 'उडान फेस्टिव्हल' शनिवारी (दि.२४) सुंदरराव मोरे आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, पोलादपूर येथे उत्साहात पार पडला. या महोत्सवात मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता.




या स्पर्धांमध्ये माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगांव येथील एकूण २९ विद्यार्थ्यांनी पाचही स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी केली. विशेष म्हणजे पथनाट्य व पोवाडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

तसेच, सर्जनशील लिखाण या स्पर्धेत दिव्यानी मालुसरे हिने प्रथम क्रमांक, तर वक्तृत्व स्पर्धेत राज संदेश ओव्हाळ याने तृतीय क्रमांक मिळवत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. या यशस्वी पथनाट्याचे लेखन व दिग्दर्शन सहा. प्रा. पंकज गायकवाड यांनी केले असून, त्यांना सहा. प्रा. मंजीरी सावंत यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयाची सांस्कृतिक प्रतिनिधी सानिया जाधव (तृतीय वर्ष, विज्ञान शाखा) हिने पोवाडा रचनेत तसेच विद्यार्थ्यांकडून तो प्रभावीपणे सादर करून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या घवघवीत यशाची दखल घेत मुंबई विद्यापीठाने दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी उडान महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी पथनाट्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरावर आमंत्रित केले आहे. तसेच, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित पोवाडा सादर करण्यासाठी मुंबई विद्यापीठात विशेष आमंत्रण देण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे, सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर, उपप्राचार्य डॉ. आचार्य, डॉ. पाण्डेय जे. आर., डॉ. संगिता गंगाराम उतेकर (ग्रंथपाल), आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख तसेच विज्ञान विभाग प्रमुख सहा. प्रा. मेहरीन डावरे, आणि सदस्य सहा. प्रा. देवांक परब, विशाखा पवार, अश्विनी शेलार, श्वेता सकपाळ, तेजस्विनी आचार्य, निहाल वलीले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# निवडक



## विद्यार्थ्यांना पौष्टिक खाऊचे वाटप

**खांब :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील देवकान्हे येथील जनसेवक संदेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यातील विविध शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये आरोग्यदायी खाऊ, आनंदी बालपण हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उद्देशाने सुमारे ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना मल्टिग्रेन शेव (पौष्टिक कुरकुरे) वाटप करण्यात आले. सध्या बाजारात मिळणारे वेफर्स आणि कुरकुरे मुलांच्या आरोग्यासाठी घातक ठरत आहेत. तर आजच्या काळात मुले जंक फूडच्या आहारी जात असताना, त्यांना सकस आहाराची गोडी लागावी. यावर पर्याय म्हणून संदेश गायकवाड यांनी गहू, मका, रवा सोयाबीन आणि कडधान्यांपासून बनवलेली प्रोटीनयुक्त मल्टिग्रेन शेव खाऊ म्हणून निवडली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमातर्गत जिल्हा परिषद शाळा, अंगणवाड्या आणि आदिवासी वाडीतील सर्व बालकांना या खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.



## पारितोषिक वितरण, सत्कार समारंभ

**उरण :** उरण येथील रामकृष्ण आत्माराम पाटील सभागृहात सोमवंशी क्षत्रिय पाठारे ज्ञाती समाजाचा पारितोषिक वितरण व सत्कार समारंभ मोठ्या जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमात ज्ञाती समाजाच्या भगिनींचा स्पर्धेतील सहभाग लक्षणीय होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष सतिश पुरव (अध्यक्ष शांती निवास, मुंबई) यांनी भुषविले. तर विशेष अतिथी म्हणून क्षात्रैक्य समाज, ठाण्याचे विश्वस्त पंकज अशोक म्हात्रे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यमान अध्यक्ष रंजन काठे यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. रंजन काठे यांनी आपल्या प्रास्ताविकात ज्ञाती समाजाच्या गोसपाड्यातील ताबेकब्जात असलेल्या पण सध्या वापरात नसलेल्या चार गुंठे जागेचा उल्लेख करत लवकरच याही जागेचा वापर समाजाच्या काही उपक्रमांसाठी सुरु करणार असल्याचे जाहीर केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी आणि विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत म्हातवलीच्या सरपंच रिना शिरधनकर व उपसरपंच निलिमा थळी यांना सो.क्ष.पा. ज्ञाती समाज उरणच्या वतीने सत्कार करण्यात आला.



## सांबरी शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**कोर्लई :** अलिबाग तालुक्यातील सांबरी येथील पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या महादेव पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. ज्येष्ठ समाजसेवक यशवंत पाटील यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन तज्ञ तथा रायगड भूषण डॉ.जयपाल पाटील, मुख्याध्यापिका मेधा दुबे, सुरेश म्हात्रे, तुषार पाटील, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, वकील, डॉक्टर व पालक उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमात प्रा.डॉ. जयपाल पाटील यांनी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा देऊन संविधानाचे महत्व सांगितले. शेतकरी पालकांनी आकाशातील वीजेबाबत दामिनी ॲप मोबाईलवर सुरक्षेसाठी डाऊनलोड करावा, महिलांनी घरातील गॅस सिलेंडर, वीजबाबत सुरक्षेबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. जयपाल पाटील, मान्यवर पालकांकडून विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिती भिंगारे यांनी केले.

## खांडस विद्यालयाला आर्थिक सहकार्य



**रसायनी :** जय जगदंबा महिला मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय खांडस या विद्यालयातील आदीवासी डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना भारतीबेन रमणिकलाल शहा चरिटेबल ट्रस्टच्यावतीने तीन वर्ग खोल्या, शाळेसाठी कार्यालय, शाळेच्या पूर्ण इमारतीस रंगरंगोटी, लाईट फिटींग, पाण्याची टाकी व पाईपलाईन, विद्यार्थ्यांना खेळाचे मैदान तसेच आर्थिक सहकार्य विद्यालयाला देण्यात आले. विद्यालयाच्या वर्ग खोल्यांचे व कार्यालयाचे व इतर कामाचे उद्घाटन शैलेश रमणिकलाल शहा व रंजना शैलेश शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शेडगे, रामेश्वर दिगंबर, राकेश गोपाळ चव्हाण, किसन महादू ऐनकर, किर्तनकार कैलास महाराज, सरपंच, पोलिस पाटील, ग्रामस्थ नागरिक, माजी विद्यार्थी, सामाजिक, धार्मिक, राजकीय, शिक्षकवर्ग, इतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रीदत्तयाग, लघुरुद्र कार्यक्रमाचे आयोजन

**आगरदांडा :** मुरुड येथील प्राचीन श्री दत्त मंदिरात सालाबादप्रमाणे श्रीदत्तयाग व लघुरुद्र कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पूजेला सुरुवात होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता महाआरती तद्नंतर दुपारी १२.३० ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तगणांना महाप्रसादाकरिता श्रीक्षेत्र दत्तमंदिर येथे जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था सुद्धा करण्यात आली आहे. सायंकाळी ६ वाजता भागवताचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वरदास सावर्डेकर महाराज, आळंदी यांची दत्त महात्म्यपर कथा होणार आहे. कथेनंतर सर्व भाविकांच्या हस्ते प्राचीन दत्त मूर्तीवर बेलपत्रांचे अर्चन होणार आहे. महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना श्रीक्षेत्र गाणगापूर येथील निर्गुण पादुकांवर लेपन केलेले चंदन, तसेच श्रीक्षेत्र कुरुवपूर येथून आणलेले भस्म आणि श्रीक्षेत्र उज्जैन येथे सिद्ध केलेले रुद्राक्ष प्रसाद म्हणून देण्यात येणार आहे.

# निवडक

## अर्चनाला राजपथावर संचलनाची संधी



**नेरळ :** उल्हासनगर येथील आर के तलरेजा महाविद्यालयातील एनसीसी क्रेडर अर्चना अभिलेख राम हिला यंदाच्या नवी दिल्लीमधील राजपथावर संचलन करण्याची संधी मिळाली. ती राष्ट्रीय प्रजासत्ताक संचलनात अर्चना सहभागी झाली होती, असा बहुमान मिळविणारी ती एमएमआर रिजनमधील एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे. उल्हासनगर येथील आर. के. तलरेजा महाविद्यालयाच्या अर्चना राम विद्यार्थीनीने दिल्लीतील राजपथावर आयोजित परेडमध्ये यशस्वी सहभाग घेतला. देश पातळीवरील या मानाच्या परेडमध्ये सहभागी होणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. या यशामागे महाविद्यालयाचे एनसीसी कॅप्टन भरत बडगुजर यांचे मार्गदर्शन आणि सततचे प्रोत्साहन मोलाचे ठरले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश काला यांनी अर्चनाचे कौतुक केले आहे.

## बागेच्या वाडीचा कायापालट



**रसायनी :** रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरा नजीकच्या दुर्गम भागातील राजिप बागेचीवाडी शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संतोष शिंगाडे यांच्या विशेष पुढाकारातून मातृसेवा आणि रोटरीच्या मदतीतून शाळेला स्वच्छतागृह बांधण्यात आले. रायगड जिल्हा परिषद बागेची वाडी हा आदिवासी दुर्गम भाग आहे. या भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी ठाण्यातील मातृसेवा फाऊंडेशन संस्थेने पुढाकार घेतला. रोटरी क्लब ऑफ ठाणे वेस्ट संस्थेमार्फत मिळालेल्या सहकार्याने शाळा पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला. या उपक्रमासाठी फ्लॅगशिप कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मोलाचे सहकार्य केले. यामुळे शाळेला आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक बदल घडून येण्यास मदत झाली आहे.



## विमला तलाव गार्डनची साफसफाई

**उरण :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून उरण नगर परिषदेच्या नगराध्यक्ष भावना घाणेकर, उरण नगर परिषदेचे नगरसेवक, संतोष पवार, मार्निंग कट्टा विमला तलाव या संघटनेचे सर्व सदस्य, ज्येष्ठ नागरिक, उरण नगरपरिषदेचे कर्मचाऱ्यांनी उरण शहरातील विमला तलाव गार्डनमध्ये हातात झाडू घेऊन कचरा साफसफाई केली. कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. उरण स्वच्छ सुंदर दिसावा, नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे या दृष्टिकोनातून सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे उरण नगरपरिषदेचे नगराध्यक्ष यांनी सांगितले. या स्वच्छता अभियानातून उरणमध्ये होणारा कचरा समस्यांचे लवकरच निवारण करण्यात येणार असल्याचेही घाणेकर यांनी सांगितले.

## कर्नाळा स्पोर्ट्सतर्फे रस्ता सुरक्षा अभियान

**पनवेल :** कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी अंतर्गत कार्यरत बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, पनवेल तसेच बार्न्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, पनवेल येथे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, वाहतूक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाला पनवेल वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, मोहन काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान औदुंबर पाटील यांनी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादेचे पालन, वाहन चालविताना मोबाईल वापर टाळणे तसेच मद्यप्राशन करून वाहन न चालवण्याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन कॉलेज व पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस अमीर मुलाणी, युवराज येळे, विश्वनाथ पाटील, महेंद्र गळवी, योगिता पाटील व संजय घाडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. प्रा. चंद्रकांत मुकादम यांनी आभार व्यक्त करण्यात आले.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- जन्नावार हॉस्पिटल अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- अलिबागमधील शॉपमध्ये काम करण्यासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ९४२२६९६२३५
- घरकामासाठी सकाळच्या वेळेत बाई पाहिजे. अर्धवेळसाठी ८ ते ११–३० स्थळ : पंतनगर, संपर्क : ८०९७२०५९३९, ९४२२३७५१२४
- पाहिजे : अलिबागमधील वृद्ध जोडप्यास भाजीबाजार आणून देण्यासाठी रोजच्या रोज दोन तासासाठी व्यक्ती, विद्यार्थ्यांस पसंती. पगार पाच हजार. संपर्क :८५३०३०९७६५
- We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# जंगलतोडीकडे वनविभागाचा कानाडोळा

**।। स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप ।। जंगल वाचवण्यासाठी योजना केवळ कागदावरच**

**। महाड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील व जिल्ह्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर जंगलतोड सुरू असून पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शासन एकीकडे पर्यावरण संरक्षण, हरित विकास आणि वृक्षलागवडीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करत असताना प्रत्यक्षात मात्र जंगलतोडीवर प्रभावी नियंत्रण दिसून येत नाही. अवैध वृक्षतोड, जंगलातील लाकूड चोरी आणि डोंगरकपारी फोडण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.

विशेष करून हे सर्व प्रकार महाड तालुक्यातील नाते विभाग तसेच विन्हेरे विभागात सर्रासपणे सुरू आहेत विशेष म्हणजे या सर्व प्रकारांकडे वनविभागाकडून जाणूनबुजून कानाडोळा केला जात



असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार हे वन अधिकारी जे शेतकरी आजही चुलीवर जेवण बनवतात ते घरी जाळण्यासाठी नेत असलेल्या गाड्या पकडून त्यांच्यावर विनाकारण दंडात्मक कारवाई करत आहेत खरे जंगल तोड करणारे नाते, वरडोली, कोतुर्डे, आदी विभागांत खैर, किटा मोठ्या प्रमाणात जंगलतोड करत आहेत त्यांच्याकडे अक्षरशः कानाडोळा करत आहेत.

रात्रीच्या वेळी जंगलात मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जात असून सकाळपर्यंत लाकूड वाहतूक केली जाते. अनेक ठिकाणी तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने वनमाफियांचे मनोबल वाढले आहे. काही भागांत तर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांशी संगनमत असल्याचीही चर्चा आहे. जंगल वाचवण्यासाठी केवळ कागदी योजना नव्हे तर कठोर कारवाईची गरज आहे. दोषींवर गुन्हे दाखल करून त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. तसेच स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवून जंगल संरक्षण समित्या सक्षम करणे आवश्यक आहे. शेवटी प्रश्न एकच आहे, जंगलतोड कधी थांबणार आणि वनविभाग कधी जागा होणार?

> **पर्यावरणाचा ढासळतोय समतोल**
>
> जंगलतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत असून वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पावसाळ्यात दरडी कोसळणे, पाणीटंचाई, तापमानात वाढ आणि जैवविविधतेचे नुकसान असे गंभीर परिणाम नागरिकांना भोगावे लागत आहेत. भविष्यात याचे परिणाम अधिक भयावह असतील, अशी भीती पर्यावरणतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## नागरिकांना नेत्रदान करण्याचे आवाहन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

चला नेत्रदानाची शपथ घेऊया आणि कुणाच्या तरी जिवनात उजेड आणुया जीवनाचे अमुल्य वरदान नेत्रहीनला नेत्रदान करुया नेत्रदान श्रेष्ठ दान आहे. एका व्यक्तीच्या नेत्रदानामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळु शकते. मूत्युनंतर नेत्रदान करणे सोपे असून यामुळे कोणत्याही धार्मिक विधीवर परिणाम होत नाही. मुत्यु नंतर सहा तासांच्या आत नेत्रदान करणे आवश्यक आहे. तरी नागरिकांनी न घाबरता नेत्रदान करा असे आवाहन जंजिरा मेडिकल असोसिएशन मुरुड लायसन क्लब व जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था




मुरुडच्या वतीने डॉ. संजय पाटील यांनी प्रजासत्ताक दिनी शहरातील आझाद चौकात व तहसीलदार कार्यालयातील प्रांगणात करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, तहसीलदार आदेश डफल, नायब तहसीलदार संजय तवर, पांडुरंग आरेकर, संजय पाटील, डॉ. राज कल्याणी, डॉ मयूर कल्याणी, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, डॉ. अमित बेनकर, डॉ. मंगेश पाटील, डॉ. वासिम पेशइमाम, सुनील पटेल, तमीम ढाकम, नौनिता कर्णिक आदिंसह असंख्य नागरिक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## देवद येथील इसम बेपत्ता

**पनवेल :** पनवेल जवळील देवद येथे राहणार एक इसम घरातुन बाहेरून जावुन येतो म्हणुन गेले असून तो अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. भगवान शिवाजी निकाळजे (वय ४२) या इसमाचे नाव असून त्याची उंची ५ फुट, रंग सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, अंगाने मध्यम, डोळे काळे, असून त्याला हिंदी, मराठी भाषा बोलता येते. या इस्माबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पो हवा चेतन पाटील यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## महिलांविरोधात पोलिसांची कारवाई



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील रस्त्याच्या फुटपाथवर जाणुनबुजुन असभ्य वर्तन करणाऱ्या सहा महिलांविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी त्या परिसरातील रहिवाशी व मुख्यत्वे करून महिला वर्गांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्याकडे केल्या होत्या. या तक्रारीची दखल घेत त्यांनी विशेष पथक तयार केले. यात सहा. पो. निरीक्षक प्रज्ञा मुंडे, साधना पवार, ज्योती कांडळ, शितल कोकणे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन अश्या प्रकारे वर्तन करणाऱ्या सहा महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात कारवाई केली आहे.

## थेरोंड्यात म्हसोबाची जत्रा उत्साहात

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

प्रतिवर्षा प्रमाणे सातारा जिल्हांतील विविध तालुका व गावातील भाविक ग्रामस्थांचे परंपरागत म्हसोबा यात्रेसाठी आगमन झाले आहे. यावर्षी सुध्दा मोठवा जल्लोषात म्हसोबा देवाचा मानपानाचा धार्मिक विधी होत आहे. पिढयानंपिढया रोजदांरी, व्यवसायाने निगडीत असलेले अनेक कुटूंब प्रतिवर्षी म्हसोबा यात्रेच्यानिमित्ताने थेरोंडा गावात येऊन ही कुंटूबे शिमग्याचे पुर्वी थेरोडा येथे एकत्रीत येतात.

तेथेच हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघु जावळे आदी आडनावाच्या कुटूंबाचे कुलैदवत मंदिर आज ही आहे.

पुर्वी रोजदांरी व्यवसायासाठी आलेली सातारकर कुटूंबे राहूट्टी उभारून वस्ती करत असावे त्यामुळे त्यांचे कुलैदवत असलेले हे मंदिर एका पत्राशेडमध्येच होते, सध्या पत्राशेडमधील मंदिराचा गाभारा तसाच ठेवीत मंदिराचे जिर्णोध्दार करण्यात आला आहे. सातारा जिल्हांतील शिरवळ, कुदाळ, रहमत्पुर, भोर, गावातून हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघू जावळे आदी आडनावाची कुंटूबे येऊन म्हसोबा यात्रा व रेवदंडा थेरोंडामध्ये धार्मिकविधी पार पाडतात.



● मुरुड समुद्रकिनारी गुढीपाडव्यानिमित्याने घोडागाडीच्या स्पर्धा होतात. त्याचा सराव करण्यासाठी सायंकाळच्या मंद प्रकाशात सराव करताना घोडागाडी मालक. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## मोटार सायकलची चोरी

**पनवेल :** कळंबोली सर्कलकडुन टी पॉईंट जंक्शन पनवेलच्या दिशेन जाणाऱ्या रोडवर, टी पॉईंट जंक्शनच्या पाठिमागे उभी करून ठेवलेली मोटार सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. कळंबोली सर्कलकडुन टी पॉईंट जंक्शन पनवेलच्या दिशेन जाणाऱ्या रोडवर, टी पॉईंट जंक्शनच्या पाठिमागे अंदाजे ३०० मिटर अंतरावर उभी करून ठेवलेली अंजली लेंगरे यांची हिरो कंपनीची कंपनीची प्लेंडर मोटार सायकल, काळया-निळया रंगाची, चोरी झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त कार रॅली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल आणि इनर व्हील क्लब, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने रस्ता सुरक्षा अभियान, २०२६ सडक सुरक्षा, जीवन रक्षा अंतर्गत महिला कार, रिक्षा, बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीचा उद्देश महिलांची सुरक्षितता, महिला सक्षमीकरण, रस्ता सुरक्षा याबाबत जनजागृती करणे हा आहे, तसेच महिलासाठी मैत्री, मानवतावादी सेवा, महिला सक्षमीकरण व सामाजिक कल्याणासाठी कार्य करणे, या उद्दिष्टांशी सुसंगत राहून हा संयुक्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आला




आहे. या उपक्रमात विविध क्षेत्रातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. या रॅलीत अबोली महिला रिक्षा संघटनेच्या महिला सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांनी वाहतूक नियमांचे पालन, सुरक्षित वाहनचालना आणि जनजागृतीचा संदेश देत रॅली यशस्वी केली.

सदर कार्यक्रमासाठी सीमा कांबळे, जयंत चव्हाण, निलेश धोटे, निलेश धोटे, गजानन ठोंबरे, प्रीती पवार, विजया चामे, कल्याणी सुरतकर आदी मान्यवर उपस्थीत होते.

सदर रॅली प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल, खारघर सेंट्रल पार्क, उत्सव चौक, पटेल चौक, विघ्नहार , डीमार्ट, शिल्प चौक, प्रशांत कॉर्नर, सेक्टर ३५, स्वप्नपूर्ती, गुरुद्वारा, सेंट्रलपार्क, प्रादेशिकपरिवहन कार्यालय, पनवेल दरमान्य आयोजित करण्यात आली होती. रॅली दरम्यान सर्व सुरक्षा उपाययोजना, वाहतूक नियम व आवश्यक प्रोटोकॉलचे काटेकोर पालन करण्यात आले. रॅलीसाठी ट्रॅफिक महिला पोलीस, पोलीस विभागातील महिला, २५ अबोली रिक्षा चालक महिला, इतर दोन चाकी आणि चार चाकी महिला चालक यांचा समावेश होता. या रॅलीमध्ये महिला मोठ्या संख्येने सहभागी होत्या.

## हवामान तंत्रज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाड येथील श्री विरेश्वर देवस्थान परिसरात दि. ३०, ३१ जानेवारी रोजी कृषिधन, कृषी विज्ञान, हवामान तंत्रज्ञान प्रदर्शन २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. कृषी, विज्ञान, हवामान व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम साधणारे हे प्रदर्शन शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व कृषी उद्योग क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरणार आहे. या प्रदर्शनात कृषी तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, विज्ञान शिक्षक, फार्मर प्रोड्युसर कंपनीचे उद्योग प्रतिनिधी एकत्र येणार असून, नवीन कृषी तंत्रज्ञान, आधुनिक शेती पद्धती, हवामान बदलाचे शेतीवरील परिणाम, कृषी उद्योगातील बदलत्या संधी, तसेच कृषी विकासात हवामान अंदाजाचे महत्त्व या विषयांवर परिसंवाद होणार आहेत. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्न कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर, ॲग्रीकल्चरल बायोटेक्नॉलॉजी व फूड टेक्नॉलॉजी, महाड येथील विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवरील मॉडेल्स सादर करण्यात येणार आहेत. यामध्ये कृषी पर्यटन, मातीविना शेती, उभी शेती, सेंद्रिय शेती, एकात्म शेती पद्धती, सौर ऊर्जा सिंचन, हरितगृह, पर्जन्यजलसाठवण, कंपोस्ट व गांडूळ खत, अन्न कचरा व्यवस्थापन, अन्न पॅकेजिंग, द्राक्ष वाईन उत्पादन, मानवी व वनस्पती पेशी, न्यूरॉन, क्लोरोप्लास्ट, कोरोना विषाणू, आरोग्य व स्वच्छता आदी विषयांचा समावेश असणार आहे.

**डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीसाठी गावदेवीची यात्रा पुढे | महाराष्ट्राला दिला एकतेचा आणि माणुसकीचा संदेश**

# धानसर ग्रामस्थांनी जपले सामाजिक सलोख्याचे मूल्य

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

राज्यात सध्या काही ठिकाणी जाणीवपूर्वक धार्मिक व सामाजिक सौहार्द बिघडवण्याचे प्रयत्न सुरू असताना, पनवेल तालुक्यातील धानसर गावाने विवेक, संयम आणि माणुसकीच्या जोरावर सामाजिक ऐक्याचे दीपस्तंभा सारखे उदाहरण उभे केले आहे. १४ फेब्रुवारी रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असल्याने त्याच दिवशी नियोजित असलेली गावदेवीची पारंपरिक यात्रा एक दिवस पुढे ढकलण्याचा सर्वानुमते निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला. या निर्णयामुळे धानसर गावाची ओळख केवळ एका गावापुरती न राहता, संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे प्रतीक असलेले संपूर्ण देशाचे महामानव आहेत. त्यांच्या जयंतीच्या दिवशी कोणताही वाद किंवा मतभेद निर्माण होऊ नयेत, ही भावना ठेवत ग्रामस्थांनी घेतलेला हा निर्णय म्हणजे घटनात्मक मूल्यांप्रती असलेली निष्ठा आणि सामाजिक सलोख्याचा विजय असल्याचे मत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. त्याच वेळी गावदेवीची श्रद्धा, धार्मिक परंपरा आणि ग्रामसंस्कृती यांचाही आदर राखत धानसर गावाने समतोलाचा सुवर्णमध्य साधला आहे.

सध्या सण-उत्सवांच्या तारखांवरून समाजात वाद, गैरसमज, अफवा आणि तणाव निर्माण होण्याच्या घटना वाढत असताना, धानसर ग्रामस्थांनी संवाद, परस्पर समजूत आणि सामंजस्याच्या माध्यमातून प्रश्नावर तोडगा काढला. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांची जयंतीचा कार्यक्रम शांततेत, आनंदात आणि मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, त्यानंतर गावदेवीची यात्रा देखील सर्व समाजघटकांच्या सहभागाने, भक्तीभावाने आणि आनंदाच्या वातावरणात पार पडणार आहे.

धार्मिक सलोखा ही केवळ भाषणांची किंवा घोषवाक्यांची बाब नसून तो प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची परंपरा धानसर गावाने वर्षानुवर्षे जपली आहे. या निर्णयाला गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला मंडळे, सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक प्रतिनिधी आणि सर्वधर्मीय ग्रामस्थांनी एकमुखी पाठिंबा दिला आहे. सण-उत्सव हे समाजाला जोडण्यासाठी असतात, समाजात फूट पाडण्यासाठी नव्हेत, हीच भावना या निर्णयामागे असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले. मतभेद असू शकतात, पण मनभेद नसावेत, हा संदेश धानसरने आपल्या कृतीतून दिला आहे.

> **संविधानिक मूल्यांचा विजय**
>
> आज समाजात द्वेष, अफवा आणि गैरसमजांच्या माध्यमातून वातावरण बिघडवण्याचे प्रयत्न होत आहेत, तेव्हा धानसर ग्रामस्थांनी घेतलेला हा निर्णय म्हणजे शांतता, बंधुता, एकता आणि संविधानिक मूल्यांचा विजय आहे. अशा सकारात्मक आणि संवेदनशील उदाहरणांमुळेच महाराष्ट्राची ‘सामाजिक सलोख्याची गौरवशाली परंपरा’ अधिक बळकट होत राहील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक दुंदा भिवा धुळे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे दहिवली तर्फे वरेडी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३९/३१ | एकुण क्षेत्र ०-१३-०० हे आर पॉ | ०-०९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/०१/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे अंजप ता. कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे. अंजप ता. कर्जत जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री.अशोक बाळाराम पाटील | ४३/१६/अ | ०-४३-०० | ०.४५ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, खरेदीखत, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २९/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड
मो.नं.८००७५३७६५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची निवासी सदनिका सदरील सदनिकेचे विद्यमान मालक श्री. हेमचंद्र पुंडलिक संसारे, रा. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याबाबत प्राथमिक चर्चा केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

अलिबाग नगर परिषद यांचे हद्दीतील सि.स.नं. ३६४ के, ३६४/१ व ३६४ या मिळकतींवरील स्थित निरज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, अलिबाग, ता. अलिबाग या इमारतीमधील रेज्ड तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४०१, क्षेत्र ६९७ चौ. फुट व ३९६ चौ. फुट ओपन टेरेस बिल्ट अप क्षेत्र ज्यासी अलिबाग नगर परिषद घर क्र. Z1JBM001173 879 (जुना मालमत्ता क्र. ALB000001171)

तरी सदरील निवासी सदनिके संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारण, गहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दिनांक :२९/०१/२०२६

**ॲड. जयेश अ. जोशी**
९३२, टिळक रोड, अलिबाग ता.
अलिबाग, जि. रायगड

## कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग
## ता.अलिबाग, जि. रायगड
## जाहीर नोटीस

मो.नं.७२७६२५११०७/८८८८१०७२१९

कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग या समितीचे आर्थिक वर्ष दि. ०१/०४/२०२६ पासून सुरु होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण अलिबाग तालुका व उरण तालुका (३३ गावे) आहेत. बाजार समितीने नियमित केलेले भात, तांदुळ, ज्वारी, बाजरी, गहु, मका, सोयाबीन, वरी, बावटे, (नाचणी), जव, बंटी, सर्व प्रकारचे कडधान्ये, सरकी, सुके खोबरे, सरसव (आळशी), साबुदाणा, राजगिरा, नारळ, सुपारी, भुईमुग, जवस, तीळ, करडई, सरकी, करळे तीळ, ओवा, शेपा, धने, मेथी, तंबाखू, मैदा, गव्हाचे पीठ, चहा, साखर, ऊस, गुळ, ड्रायफ्रुटस्, खाद्यतेल (सर्व प्रकार) तुप, सर्व प्रकारची फळे, सर्व प्रकारची फुले, सर्व प्रकारचा भाजीपाला, कांदे,बटाटे, लसूण, आले, मिरची पावडर, वेलची, मिरी, बडीशेप, कोकम, जायफळ, विडीची पाने, काजू, जिरे, राई (मोहरी), डिंक (गोंद), चिंच, लवंग, दालचिनी, नागकेशर, अंडी, कोंबड्या, गुरेढोरे, शेळ्या-मेंढ्या, मासळी (ओली व सुकी), बांबू व जळावू लाकूड. यासारख्या शेतीमालाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहार करणारे व्यापारी, कमिशन एजंट, प्रक्रिया करणारे, शेती मालाची साठवण करणारे स्टोरेज सुपरीटेन्डट, हमाल, तोलाई, दलाल व त्यांचे मदतनीस वगैरे संबंधित इसमांनी सन २०२६-२०२७ सालाकरिता ५ (अ) अन्वये अनुज्ञप्तीच्या (लायसेन्स) नुतनीकरणासाठी दि. ०१/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ पर्यंत अनुज्ञप्ती नुतनीकरण फी कार्यालयीन वेळेमध्ये भरुन अनुज्ञप्ती नुतनीकरण करुन घ्यावे.

दि.०१/०२/२०२६ ते दि. २८/०२/२०२६ या मुदतीत अनुज्ञप्तीचे नुतनीकरण न केल्यास तद्नंतर विलंब आकारासह (प्रतिदिन रु. २०/-) प्रमाणे दंड आकारणी करुन नुतनीकरण करुन देण्यात येईल. तरी वर नमुद केल्याप्रमाणे समितीच्या कार्यक्षेत्रातील विविध शेतमालाचे खरेदी विक्रीच्या व्यवहार करणारे, स्वस्त धान्य दुकानदार व संबंधित अधिकारी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह अधिकारी व सब एजंटस् हे बाजार समितीचे लायसेन्स घेणे पात्र ठरतील.

समितीने नियमित केलेल्या शेतमालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार विना अनुज्ञप्तीने (विना लायसेन्स) अलिबाग बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात करीत असतील त्यांच्यावर महाराष्ट्र कृषी उत्पन्न विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार योग्य ती पुढील कारवाई करणेत येईल व होणारे सर्व परिणामांची व खर्चाची जबाबदारी त्यांचेवर राहील. अनुज्ञप्ती न घेणारे इसम गुन्ह्यास पात्र ठरतील.

अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी करावयाचे अर्ज व इतर माहिती कार्यालयीन वेळेत समितीचे कार्यालयात मिळू शकतील.

**श्री. मंगेश रा.राऊत** — **सहा.सचिव**
**श्री.आर.डी.मोरे** — **प्र.सचिव**
**श्री. कमळाकर गो.साखळे** — **सभापती**
**कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग, जि.रायगड**

टिप- सर्व अनुज्ञप्ती (लायसेन्स) धारकांनी आपल्याकडील खरेदीचे सन २०२५-२०२६ चे खरेदीचे अहवाल सादर करुन येणे असलेली बाजार फी व सुपरव्हीजन फी च्या रक्कमा कार्यालयात भरणा कराव्यात. अन्यथा त्यांचे लायसेन्स नुतनीकरण केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कार्यालय - फ्लॅट नं. ८, पहिला मजला, बिल्डींग नं.२,
सी.विंग,पी.एन.पी. नगर, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-नागेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र. | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| डेनिस स्टिफन रॉबर्टस | ५३ | ३ फ | ०-५४-० | ० | ४९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२९/०१/२०२६

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या वतीने, वरिष्ठ प्रादेशिक सिग्नल व टेलिकॉम अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून अनुभवी ठेकेदारांकडून खालील कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नाव: "कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील चिपळूण स्थानकावर विद्यमान डोमिनो टाईप कंट्रोल कम इंडिकेशन पॅनल (सीसीआयपी) चे बदल." निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-एसजी-टी-09ए-2025-26, दिनांक 29.01.2026. कामाचा अंदाजित खर्च**: रु. 5.328 लाख. **ईएमडी रक्कम**: रु. 10,700/-. **बोली सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 19.02.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी संपर्क: प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी. (संकेतस्थळ : **www.ireps.gov.in**).

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सिताबाई रामचंद्र म्हात्रे, २) नरेंद्र रामचंद्र म्हात्रे, ३) देवेंद्र रामचंद्र म्हात्रे, ४) प्रजेंद्र रामचंद्र म्हात्रे, ५) किशोर रामचंद्र म्हात्रे, ६) धर्मेंद्र रामचंद्र म्हात्रे, ७) नंदिनी प्रविण पाटील, ८) वर्षाराणी जयवंत ठाकूर आणि ९) जयवंती लक्ष्मीकांत पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची (मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - शहाबाज, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २८३, एकूण क्षेत्र ००.२८.६० (हे. आर. चौ. मी.) आकार ३ रु. ६७ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्ध :
उत्तरेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग २९२ आणि २९३
दक्षिणेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग २८१
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग २८२
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग २८४
ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०१/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्रीम अनुसया परशुराम बोरकर, रा. माणगांव तर्फे वरेडी, रा.आषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे माणगांव तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १०० | २ | ०-१३-१० | ०=८१ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि .२९/१/२०२६

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं.४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्रीम.वासंती चंद्रकांत कदम व इतर, रा. आषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे आषाणे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ४० | १/ब | ०.४०.०० | ०.१९ |

पैकी अविभक्त हिश्याचे विक्री केलेले क्षेत्र ०.४.४ (हे.आर.पॉ.)

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २९/१/२०२६

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं.४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिल सौ. निशिगंधा निवास म्हात्रे रा. नागांव, काठेआळी, उरण, ता. उरण, जि. रायगड यांच्या वडिलोपार्जित मौजे बामणसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाच्या तसेच इतर मिळकती आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बामणसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड | १११ | ०-३१-५०<br>पो.ख.०-०९-००<br>०-४०-५०<br>**पैकी ०-१५-१९** | ०.५६ |
| बामणसुरे ता. अलिबाग, जि. रायगड | ९८ | ०-२८-००<br>पो.ख. ०-०१-००<br>०-२९-००<br>**पैकी ०-१०-८८** | १.०० |
| बामणसुरे, ता.अलिबाग, जि. रायगड | ९९ | ०-५०-८०<br>पो.ख. ०-०६-६०<br>०-५७-४०<br>**पैकी ०-२१-५३** | १३.७९ |

सदरहू मिळकतींसंबंधी दि.०९/१०/२०२५ रोजी दस्त क्र. ४९९८/२०२५ ने व दस्त क्र.४९९९/२०२५ ने आमच्या अशिलांकडून, श्री. अनंत देवजी पाटील रा.संकल्पसिध्दी बिल्डिंग, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी अनाधिकाराने व बेकायदेशरपणे फसवून अविभक्त हिश्श्याचा साठेकरार व अखत्यारपत्र नोंदणीकृत करुन घेतलेले आहे.

आमचे अशिलांकडून दि. ०९/१०/२०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग येथे श्री.अनंत देवजी पाटील यांनी तथाकथित नोंदणीकृत करुन घेतलेले साठेकरार व अखत्यारपत्र आमचे अशिल रद्द करीत आहेत. अखत्यारपत्राच्या आधारे श्री. अनंत देवजी पाटील यांनी वर नमुद मिळकतींविषयी कोणतीही कामे करण्याची नाहीत. आमचे अशिलांना सदरहू मिळकतींविषयी स्वतःहून कायदेशीर सर्व कामे करण्याची आहेत.

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांकडून श्री.अनंत देवजी पाटील यांनी दि. ०९/१०/२०२५ रोजी दस्त क्र.४९९९/२०२५ ने करुन घेतलेले अखत्यारपत्र या नोटीसीने आमचे अशिल रद्द करीत असल्यामुळे मौजे बामणसुरे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १११, ९८ व ९९ या मिळकतींसदर्भात कुणीही कोणत्याही प्रकारची श्री. अनंत देवजी पाटील यांचेबरोबर कामे अथवा व्यवहार करु नयेत याची नोंद घ्यावी. तसेच या नोटीसीने दि.०९/१०/२०२५ रोजी आमच्या अशिलांकडून श्री.अनंत देवजी पाटील यांनी करुन घेतलेले अखत्यारपत्र रद्द झालेले आहे असे समजण्यात यावे.

अलिबाग.
दिनांक : २८/०१/२०२६.

**ॲड. सविता एस. पिंगळे**
२०१, 'सृष्टी' दुसरा मजला वेधशाळेजवळ, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९७६७५०७२७२.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील मिळकतीचे मालक धर्मा नारायण मोरे यांच्याकडून खालील वर्णन केलेली मिळकत कायमची खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मौजे अंत्राट तर्फे वरेडी ता. कर्जत जि.रायगड

| सर्वे नं. | क्षेत्र | पो.ख. | आकार (रु.पै.) | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ९५/४ | ०-८९-०० | ००-१०-०० | ०-१०-०० | ०-९९-०० |
| ०-९९-०० पैकी लिहून देणार यांचे क्षेत्र<br>एकूण क्षेत्र ००-४९-०० हे.चौ.मी. | | | | |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि.२८/१/२०२६

**ॲड. श्रीकृष्ण पालू डुकरे**
पत्ता-तुलसी सेंटर पॉइंट ऑफिस नं.४२,
पहिला मजला, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड मो.-९३२६२३९२५९

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग अलिबाग

**चौकशीची जाहिर नोटीस** जा.क्र/नोंदणी शाखा/२१८/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग याचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफिसजवळ
अलिबाग, जि.रायगड
दि.२७/०१/२०२६

अर्ज क्रमांक :- ०९/२०२६
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- फिरोझा रहीम शेख चॅरिटेबल स्ट्रस्ट, अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.... ....बाबत

**ॲड.उनैझा वासीम सय्यद** ....अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग, अलिबाग हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल/ अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम- ५००/-रूपये
(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन) निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही. असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड.**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सिताबाई बळीराम कडवे, २) रविंद्र बळीराम कडवे, ३) नाथा बळीराम कडवे, ४) मिना दिनानाथ मोहिते, ५) रेश्मा महेश म्हात्रे आणि ६) रचना रमेश थळे खाते क्र. २४ यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - विर्तसारळ, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४/२, एकूण क्षेत्र ००-२८-०० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ००.४९ /- पैकी क्षेत्र ००-११-०० (हे.आर.चौ.मी.) खाते क्र. २४ साठी सदर जाहीर सूचना देण्यात येत आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०९/२०२६

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली बिनशेती मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या बिनशेती मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक सुभाष नारायण ठाकुर यांचेसोबत झालेली आहे. सदरची बिनशेती मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर बिनशेती मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग | ५४ | २४-००-०० | २४०.०० |

या बिनशेती मिळकतीपैकी सुभाष नारायण ठाकुर यांच्या हिश्याचे क्षेत्र ३-००-०० आर.चौ.मी आकार ३०.०० रु. पैसे ही बिनशेती मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील बिनशेती मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील बिनशेती मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची बिनशेती मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे बिनशेती मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड.आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३ /
९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींचे मालक मिलिंद दिनकर कोर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १६ | २ | एकुण क्षेत्र ०-४१-५०<br>पैकी विकत देणार यांचे<br>मालकीचे क्षेत्र ०-२२-०० | ३-६४ |
| १६ | ६ | ०-२९-३० | ३-०० |
| १७ | ३/क | ०-१३-०० | ०-०९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २९/०१/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत,
जि. रायगड मो.नं ९१५८३१३७३३

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. गोपीनाथ यशवंत सरफरे २. सौ. स्वाती गोपीनाथ सरफरे रा.३११, मोनिका को.ऑप.हौ.सोसा., ए/३१, दादाभाई क्रॉस रोड, जे.पी.रोड अंधेरी पश्चिम, मुंबई ४०० ०५८ यांच्या नांवे असलेल्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| काविर ता.अलिबाग | ४० | ०-९०-८०<br>पो.ख.०-२२-८०<br>एकूण १-१३-६० | १७.७८ |

या मिळकतीपैकी १. श्री.गोपीनाथ यशवंत सरफरे २. सौ.स्वाती गोपीनाथ सरफरे यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील क्षेत्र ०-२१-०० हे.आर., आकार रु. ४.११ पैसे या मिळकतीबाबत.

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन आमचे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : २८/०१/२०२६

सही / -
**शेखर विष्णू मगर**
पत्ता :-दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागांव ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक मोहम्मद असरफ अन्सारी, रा.फोर्ट मुंबई यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग जि. रायगड | १९९२/४ | २४-६९-०० | २४६.९० |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २९/०१/२०२६

सही /-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## निवडक

### जेकब मार्टिनला अटक

**वडोदरा :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिकेची रणधुमाळी सुरू असतानाच, क्रिकेट विश्वातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू आणि बडोद्याचे दिग्गज खेळाडू जेकब मार्टिन यांना वडोदरा पोलिसांनी अटक केली आहे. ड्रंक अँड ड्राईव्ह केसमध्ये ही कारवाई करण्यात आली असून, नशेच्या अवस्थेत मार्टिन यांनी आपल्या कारने तीन वाहनांना जोरदार धडक दिली.५३ वर्षीय जेकब मार्टिन हे आपली कार घेऊन अकोटा दांडिया बाजार ब्रिजवरून जात होते. यावेळी ते पूर्णपणे मद्याच्या नशेत होते. नशेमुळे त्यांचा कारवरील ताबा सुटला आणि त्यांनी समोरून येणाऱ्या दोन ते तीन वाहनांना धडक दिली. या अपघातानंतर पुलावर मोठी खळबळ उडाली आणि वाहतूक कोंडी झाली. प्राथमिक तपासणीत जेकब मार्टिन हे मद्याच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यांना अटक केली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे वृत्त आहे, मात्र वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमधील किंग जेकब मार्टिन हे भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधील अत्यंत मोठे नाव आहे. १९९९ ते २००१ दरम्यान त्यांनी भारतासाठी १० एकदिवसीय सामने खेळले आहेत. १३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये त्यांनी २३ शतके आणि ४७ अर्धशतकांच्या मदतीने ९,१९२ धावा केल्या आहेत. त्यांचा सर्वोच्च स्कोअर २७१ धावा असा आहे. निवृत्तीनंतर ते प्रशिक्षक म्हणून सक्रिय असून बडोदा क्रिकेट असोसिएशनच्या अंडर-१९ टीमचे कोच म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

### ‘निवृत्तीचा आताच विचार नाही’

**नवी दिल्ली :** फलंदाज लोकेश राहुलने कबूल केले की, त्याच्या मनात निवृत्तीचा विचार आला होता. मात्र, अद्याप निवृत्तीसाठी काही काळ बाकी असल्याचे सांगत, जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा आपण त्यास उशीर करणार नाही, असे त्याने स्पष्ट केले आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनसोबतच्या संवादात राहुलने आपल्या भविष्यातील योजनांवर प्रकाश टाकला. तो म्हणाला, निवृत्ती घेणे हा माझ्यासाठी कठीण निर्णय नसेल, कारण क्रिकेटपलीकडेही आयुष्य आहे. मी निवृत्तीबाबत विचार केला आहे. मला वाटत नाही की हा निर्णय घेणे इतके कठीण असेल. जर तुम्ही स्वतःशी प्रामाणिक असाल, तर जेव्हा वेळ येईल तेव्हा ती टाळण्यात काही अर्थ उरणार नाही. अर्थात, याला अजून काही वेळ लागेल.राहुल स्वतःला सुपरस्टार न मानण्यावर भर देत म्हणाला, तुमच्याकडे जे काही आहे, त्याचा आनंद घ्या. तुमचे कुटुंबही आहे, त्यामुळे तुम्हाला जे आवडते तेच करा. मी स्वतःला हे समजावण्याचा प्रयत्न करतो की मी खूप महत्त्वाचा नाही. आपल्या देशात आणि जगात क्रिकेट सुरूच राहणार आहे.

## ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धा

# पाकिस्तानच्या सहभागाविषयी साशंकता

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट संघाच्या पुढील महिन्यापासून सुरू होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील सहभागाबद्दल अद्याप संदिग्धताच बाळगण्यात येत आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतल्यानंतर सहभागाविषयी शुक्रवार किंवा सोमवारपर्यंत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे स्पष्ट केले.



पंतप्रधान शरीफ यांची भेट घेऊन त्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने अलीकडेच बांगलादेश क्रिकेट संघाबाबत घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी सर्व पर्याय खुले ठेवून हा प्रश्न निकालांत काढण्याचे आश्वासन दिल्याचे नक्वी यांनी सांगितले. यासाठी शुक्रवार किंवा सोमवारपर्यंत निर्णय घेण्यावर आमच्या दोघांचेही एकमत झाल्याचे नक्वी यांनी म्हटले आहे.

**पूर्ण बहिष्कार अशक्य**

नक्वी आणि पंतप्रधान शरीफ यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सहभागाबाबत बहिष्कारासंदर्भात असलेल्या पर्यायांबाबत विचार करण्यात आला. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार पूर्ण स्पर्धेवर बहिष्कार किंवा निषेध म्हणून १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध होणारा सामना खेळण्यास नकार देणे या पर्यायांचा विचार केला जात आहे. अर्थात, पीसीबीने या संदर्भात सार्वजनिकपणे कुठलीही टिप्पणी किंवा प्रतिक्रिया दिलेली नाही. नक्वी यांनी बहिष्काराची भूमिका घेतल्यानंतर चोवीस तासांत पाकिस्तान संघाची घोषणा केली. त्या वेळी निवड समिती प्रमुख अकिब जावेद यांनी संघाचा सहभाग सरकारच्या आदेशावर अवलंबून असेल, असे सांगितले.

**आयसीसी अनभिज्ञ**

पाकिस्तानच्या बहिष्काराची नोंद आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) घेतली असली, तरी सहभागाचा निर्णय घेण्यासाठी घेतलेल्या कालावधीबाबत आयसीसी अनभिज्ञ असल्याचे समजते. आयसीसीने पुढील आठवड्यापर्यंत निर्णय लांबविल्यास सर्वच प्रक्रियेला उशीर होणार आहे. कारण पाकिस्तानचा स्पर्धेतील उद्घाटनाचा सामना ७ फेब्रुवारी रोजी कोलंबोत नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे.

**पाकिस्तानचा विरोध का?**

पर्यायी केंद्रावर खेळण्याचा प्रस्ताव धुडकाविल्यानंतर बांगलादेशने विश्वचषक स्पर्धेत भारतात खेळण्यास नकार दिला. त्यांच्या या निर्णयानंतर आयसीसीने बांगलादेश संघाला थेट स्पर्धेतून वगळले. त्यांच्या जागी स्कॉटलंडला प्रवेश दिला. हा निर्णय म्हणजे आयसीसी भारताच्या बाबतीत दुहेरी मापदंड वापरत असल्याची टीका पीसीबीने केली आहे. अशीच भूमिका असेल, तर पाकिस्तानच्या सहभागावरही शंका उपस्थित व्हायला हवी, असे नक्वी यांचे म्हणणे होते. बांगलादेशवर हा अन्याय आहे. प्रत्येक वेळेस बीसीसीआय सांगेल तसे होत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही.

आम्हाला जर कोलंबोत खेळण्याची परवानगी मिळते, तशी ती बांगलादेशलाही मिळायला हवी, अशी भूमिका पीसीबीने घेतली. विशेष म्हणजे आयसीसी मंडळाच्या बैठकीत देखील ४५ सदस्यांपैकी केवळ पाकिस्तानने बीसीबीच्या भूमिकेला पाठिंबा दिला होता.

**पाकचे क्रिकेट पणाला नको**

बांगलादेश क्रिकेट संघाला पाठिंबा व्यक्त करण्यापर्यंत ठीक आहे. मात्र, त्यासाठी पाकिस्तानातील क्रिकेट पणाला लावू नये आणि ङ्गआयसीसीफ्शी असलेले संबंध बिघडण्यापासून दूर रहावे असे मत पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटू आणि पाकिस्तान मंडळातील माजी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

बांगलादेशला पाठिंबा देण्यासाठी स्पर्धेतून माघार घेतल्यास आयसीसीबरोबरचे संबंधही बिघडणार आहेत आणि भविष्यात त्याचे परिणाम होण्याची भीती देखील व्यक्त होत आहे. पाकिस्तान सर्व सामने श्रीलंकेत खेळणार आहे.

बांगलादेश आयसीसीच्या निर्णयाला आव्हान देणार नाही, मग बहिष्कार ही भूमिका घेऊन आपण पाकिस्तानातील क्रिकेट का पणाला लावत आहोत, असाच सूर माजी कर्णधार इंझमाम उल हक, मोहसीन खान, हरुन रशीद यांच्यासह पीसीबीचे माजी पदाधिकारी यांनी आळवला आहे.

# कुणाल हर्णेकरची महाराष्ट्र कबड्डी संघात निवड

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील कालवण या छोट्याशा गावातून मोठ्या स्वप्नांची उंच भरारी घेणाऱ्या कुणाल सुरेश हर्णेकर याची थेट महाराष्ट्र कबड्डी संघात निवड होणे ही संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

कुणाल सध्या सतेज संघ, बाणेर (पुणे) या संघाकडून कबड्डी खेळत असून,२५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान पुणे येथे झालेल्या ५१व्या राज्य अजिंक्य निवड चाचणी स्पर्धेत त्याने उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धेत पुणे जिल्हा पुणे



शहर विभागातून निवड होऊन त्याने आपल्या खेळाची चुणूक दाखवली. त्याच जोरावर त्याची आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे १५ ते १८ जानेवारी दरम्यान होणाऱ्या ५१व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. कुणालचा शैक्षणिक प्रवासही तितकाच प्रेरणादायी आहे. त्याचे पहिली ते तिसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण रायगड जिल्हा परिषद शाळा, कालवण येथे झाले. पुढे चौथी ते दहावीपर्यंतचे शिक्षण राजा शिवाजी विद्यालय, नालासोपारा येथे घेतले. सध्या तो अकरावी ते तेरावीचे शिक्षण अभिनव कॉलेज, भाईंदर येथे घेत असून, शिक्षण आणि खेळ यांचा समतोल साधत तो पुढे वाटचाल करत आहे. कुणालच्या या यशामागे त्याचे अथक कष्ट, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे पाठबळ आणि कुटुंबीयांचा विश्वास मोलाचा ठरला आहे. अनेक अडचणी, आर्थिक मर्यादा आणि ग्रामीण भागातील वास्तव असूनही कुणालने कधीही हार मानली नाही. प्रत्येक सरावात, प्रत्येक सामन्यात त्याने स्वतःला सिद्ध करण्याचा ध्यास घेतला आणि आज त्याचे स्वप्न साकार झाले आहे. कुणाल हर्णेकरची महाराष्ट्र संघात झालेली निवड हे केवळ वैयक्तिक यश नसून खेळाडूंना प्रेरणा देणारी आहे.

# इटलीच्या संघाने रचला इतिहास

**। इटली । वृत्तसंस्था ।**

युएईमध्ये सुरू असलेल्या टी२० तिरंगी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात इटलीने आयर्लंडला हरवून सर्वांना आश्चर्यचकित केले. त्यांनी टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इतिहास रचला. इटालियन क्रिकेट संघाचा पूर्ण सदस्य देशाविरुद्ध हा पहिलाच विजय ठरला.

२६ जानेवारी रोजी दुबई येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात इटलीने आयर्लंडचा चार विकेट्सने पराभव केला. इटलीने शेवटच्या दोन षटकांमध्ये तीन चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. महत्त्वाची बाब म्हणजे, या सामन्यात एका फलंदाजाने थेट भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माच्या कामगिरीशी बरोबरी केली. इटलीविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडला पूर्ण २० षटके खेळता आली नाहीत आणि १९.४ षटकांत १५४ धावांतच त्यांचा डाव संपला. १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, इटलीला विजयासाठी शेवटच्या दोन षटकांत ३० धावांची आवश्यकता होती. ११व्या क्रमांकावर असलेल्या इटलीच्या फलंदाजाने सामना फिरवला.

# इंग्लंडचा सामन्यासह मालिका विजय

## श्रीलंकेचा फायनलमध्ये ५३ धावांनी धुव्वा

**। इंग्लंड । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट टीमने श्रीलंकेवर तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात ५३ धावांनी विजय मिळवला आहे. इंग्लंडने कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये जो रुट आणि हॅरी ब्रूक या दोघांनी केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर श्रीलंकेसमोर ३५८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. यजमान श्रीलंकेच्या फलंदाजांनीही विजयी धावांचा पाठलाग करताना जोर लावला. श्रीलंकेला विजयी करण्यासाठी पुरेपुर प्रयत्न केले. मात्र इंग्लंडच्या गोलंदाजांसमोर श्रीलंकेचे प्रयत्न अपुरे पडले.



श्रीलंकेला पूर्ण ५० ओव्हरही खेळता आलं नाही. इंग्लंडने श्रीलंकेला ४६.४ ओव्हरमध्ये ३०४ रन्सवर गुंडाळलं. इंग्लंडने यासह सलग दुसऱ्या सामन्यासह मालिका आपल्या नावावर केली. श्रीलंकेने या मालिकेत विजयी सलामी दिली होती. मात्र त्यानंतर पाहुण्या इंग्लंडने कमबॅक करत मालिकेवर नाव कोरलं.

इंग्लंडने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. इंग्लंडच्या सलामी जोडीला काही खास करता आलं नाही. रेहमान अहमद २४ तर बेन डकेट ७ धावांवर बाद झाले. मात्र त्यानंतर जो रुट आणि जेकब बेथल या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १२४ बॉलमध्ये १२६ रन्सची पार्टनरशीप केली. जेकब बेथल आऊट झाल्याने ही भागीदारी मोडीत निघाली. जेकबने ६५ धावा केल्या.

त्यानंतर जो रुट आणि हॅरी ब्रूक या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ११३ चेंडूत १९१ धावांची नाबाद भागीदारी केली. या दरम्यान दोघांनी शतकं झळकावली. रुटने १११ तर हॅरी ब्रूक याने १३६ धावांची खेळी केली. श्रीलंकेकडून तिघांनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली.

श्रीलंकेची विजयी धावांचा पाठलाग करताना ठिकठाक सुरुवात झाली. पहिल्या ६ फलंदाजांना अपेक्षित सुरुवात मिळाली. त्यामुळे चाहत्यांना टफ फाईट पाहायला मिळाली. श्रीलंकेच्या फलंदाजांनी टीमला जिंकवण्यासाठी जोर लावला. मात्र अपवाद वगळता इतरांना त्या खेळीचं मोठ्या आकड्यात रुपांतर करता आलं नाही. इंग्लंडने श्रीलंकेला ठराविक अंतराने झटके दिले. त्यामुळे श्रीलंकेचा ५० ओव्हरआधीच कार्यक्रम आटोपला. श्रीलंकेसाठी पवन रथनायके याने सर्वाधिक १२१ धावा केल्या.

# स्कॉटलंडचा संघ जाहीर

**एडिनबर्ग:** बांगला देशाऐवजी टी-२० विश्वचषकात सहभागी होणाऱ्या स्कॉटलंडने सोमवारी १५ सदस्यांचा संघ जाहीर केला. हा संघ याच आठवड्यात भारतात येणार आहे. संघातील पाकिस्तानी वंशाचा वेगवान गोलंदाज सफयान शरीफ याच्यासह काही खेळाडूंच्या व्हीसाचा प्रश्न उपस्थित झाला असून, आयसीसी याबाबत बीसीसीआयशी सल्लामसलत करीत आहे. स्कॉटलंडचा पहिला सामना कोलकाता येथे ७ फेब्रुवारी रोजी वेस्ट इंडिजविरुद्ध होईल.स्कॉटलंड संघ: रिची बॅरिंग्टन (कर्णधार), टॉम ब्रूस, मॅथ्यू क्रॉस, ब्रॅड करी, ओली डेव्हिडसन, ख्रिस ग्रीव्ह्स, जेनुल्लाह इहसान, मायकल जोन्स, मायकल लीस्क, फिनले मॅकक्रेथ, ब्रँडन मॅकमुलन, जॉर्ज मुन्से, सफयान शरीफ, मार्क वाट, ब्रॅड व्हील.वेगवान गोलंदाज सफयान शरीफचा जन्म इंग्लंडच्या हडर्सफिल्डमध्ये झाला. त्याचे वडील पाकिस्तानी आणि आई ब्रिटिश-पाकिस्तानी आहे. वयाच्या ७ व्या वर्षी तो स्कॉटलंडला स्थायिक झाला.

# ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये अल्काराझचा उत्तम खेळ

**मेलबर्न :** गतवर्षीच्या उपविजेत्या अरिना सबालेन्का आणि अॅलेक्झांडर झ्वेरेव यांनी मंगळवारी युवा टेनिसपटूंवर विजय मिळवून उपांत्य फेरी गाठली. तसेच स्पेनचा अग्रमानांकित कार्लोस अल्काराझही अखेरच्या चार खेळाडूंमध्ये दाखल झाला आहे.

सबालेन्काने अमेरिकेच्या १८ वर्षीय इवा जोविचचे आव्हाने सहज संपुष्टात आणले. पुरुष एकेरीत मात्र झ्वेरेवला २० वर्षीय लर्नर टिएनचा कडवा प्रतिकार सहन करावा लागला. झ्वेरेवने लढत जिंकली. पुरुष एकेरीत कार्लोस अल्काराझने स्थानिक खेळाडू अॅलेक्स डी मिनाऊचे आव्हान सहज संपुष्टात आणले. वयाच्या २३व्या वर्षी कारकीर्दीत दहाव्यांदा ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्याच्या बियॉर्न बोर्ग, राफेल नदाल आणि बोरिस बेकर यांच्या कामगिरीची त्याने बरोबरी केली. अल्काराझने सहा ग्रँडस्लॅम विजेतीपदे मिळविली आहेत, मात्र यात ऑस्ट्रेलियन स्पर्धेचा समावेश नाही. मिनाऊरविरुद्ध खेळताना अल्काराझने सात वेळा स्व्हिहस ब्रेक केली आणि केवळ दोन वेळा आपली स्व्हिहस गमावली.




## झिम्बाब्वे २०४ धावांनी पराभूत | नेट रनरेटने पाकचे गणित बिघडले

# भारताची उपांत्य फेरीच्या दिशेने कूच

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

अंडर १९ वनडे वर्ल्डकप स्पर्धेच्या सुपर सिक्स फेरीत भारत आणि झिम्बाब्वे हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात नाणेफेकीचा कौल हा झिम्बाब्वेच्या बाजूने लागला. भारतीय फलंदाजांनी झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना अक्षरश: सळो की पळो करून सोडलं. भारताने या सामन्यात ५० षटकांचा खेळ खेळला आणि ८ गडी गमवून ३५२ धावा केल्या.

३५३ धावांचं आव्हान गाठणं काही झिम्बाब्वेला जमलं नाही आणि संपूर्ण संघ अवघ्या १४८ धावांवर बाद झाला. हा सामना भारताने २०४ धावांनी जिंकला. या विजयामुळे भारताचा उपांत्य फेरीतील दावा पक्का झाला आहे. कारण भारताच्या खात्यात फक्त दोन गुणच नाही तर मोठ्या फरकाने जिंकल्याने नेट रनरेटही सुधारला आहे. आता पाकिस्तानचं गणित यामुळे बिघडलं आहे.

भारताकडून एरॉन जॉर्ज आणि वैभव सूर्यवंशी ही जोडी मैदानात उतरली होती. पहिल्या विकेटसाठी या जोडीने ४४ धावांची भागीदारी केली. एरॉन जॉर्ज २३ धावा करून बाद झाला. त्यानंतर आयुष म्हात्रे आला आणि २१ धावांची खेळी करून तंबूत परतला. वैभव सूर्यवंशीचा झंझावात सुरू झाला. त्याने ३० चेंडूत ५२ धावांची खेळी केली. त्याने ४ चौकार आणि ४ षटकार मारत अर्धशतक पूर्ण केलं. वेदांत त्रिवेदी १८ चेंडूत १५ धावा करून बाद झाला. भारताने १३० धावांवर ४ गडी गमावले होते. विहान मल्होत्रा आणि अभिज्ञान कुंडू यांनी जबरदस्त खेळी केली. या जोडीने पाचव्या विकेटसाठी ११३ धावांची भागीदारी केली. अभिज्ञान कुंडू ६२ चेंडूत ६१ धावा करून बाद झाला. तर विहान मल्होत्राने शेवटपर्यंत नाबाद राहिला. त्याने १०७ चेंडूत ७ चौकारांच्या मदतीने नाबाद १०७ धावा केल्या. भारताने विजयासाठी दिलेल्या धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात काही चांगली झाली नाही. आघाडीचे फलंदाज झटपट बाद झाले. लीरॉय चिवौला याने ६२ धावा केल्या. या व्यतिरिक्त एकही फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. भारताकडून कर्णधार आयुष म्हात्रेने ४ षटकात १४ धावा देत ३ गडी बाद केले. तर उद्धव मोहनने ६.४ षटकात २० धावा देत ३ गडी बाद केले. आरएस अंब्रिशनने २ विकेट, तर हेनिल पटेल आणि खिलान पटेल यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आँर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)